क्र. साप्रवि/मभाक/स.आ.२०/२०(१०)/
०८७०४

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ,
हॉंगकॉंग बँक इमारत,
हुतात्मा चौक, फोर्ट,
मुंबई – ४०० ००१.

दिनांक : २१ जून १९८८

– परिपत्रक क्र. ४४ / मभाक –

विषय : महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ कर्मचारी वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ति योजना व तदनुषंगिक बाबींचे मराठीकरण.

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ कर्मचारी वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ति योजना व तदनुषंगिक बाबींचे मराठीकरण करून यासोबत जोडले आहे.

२. तरी संबंधित अधिकारी व कर्मचारी यांनी यापुढे वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ती प्रकरणी या मराठीकरणाचा वापर करावा. एखाद्या नियमाच्या बाबतीत भाषेमुळे काही अडचण उद्भवल्यास त्या प्रकरणी इंग्रजी नियम प्रमाण मानावेत.

दि. दा. कदम (?)

सह सचिव (मंडळ)

सहपत्र : वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ति नियम.

प्रत :

प्रेषण यादीप्रमाणे सर्वांना.

चा/–

## महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ कर्मचारी वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ति योजना व तदनुषंगिक बाबी.

१. एक) संक्षिप्त नाव : या विनियमांना "महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ कर्मचारी वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ति योजना विनियम, १९६३" असे म्हणावे.

दोन) अर्थविवरण : या विनियमांमध्ये विषय किंवा संदर्भ यामध्ये कोणतीही प्रतिकूल गोष्ट नसेल तर,-

(क) "मंडळ" म्हणजे, विद्युत (पुरवठा) अधिनियम, १९४८ चे कलम ५ अन्वये घटित करण्यात आलेले महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ;

(ख) "अध्यक्ष" म्हणजे, मंडळाचा अध्यक्ष;

(ग) "सचिव" म्हणजे, मंडळाचा सचिव;

(घ) "वैद्यकीय सल्लागार" म्हणजे, मंडळाचा (मुख्य कार्यालयातील) वैद्यकीय सल्लागार;

x(च) [ "कुटुंब" म्हणजे, -

मंडळाच्या कर्मचा-यावर पूर्णत: अवलंबून असलेल्या व त्याच्याबरोबर राहणा-या पुढील व्यक्ती होत -

पत्नी किंवा पती, औरस व सावत्र मुले, माता-पिता, अविवाहित बहिणी व १८ वर्षाखालील भाऊ; ]

(छ) "कर्मचारी" म्हणजे, मंडळाचे नियमित कर्मचारी;

(ज) "ठिकाण" म्हणजे, कर्मचा-याला त्याची कर्तव्ये पार पाडण्यासाठी ज्या ठिकाणी पदस्थापित करण्यात आले असेल ते ठिकाण;

=(झ) [ "वर्ष" म्हणजे, प्रत्येक वर्षी दिनांक १ जानेवारी पासून सुरू होणारे व दिनांक ३१ डिसेंबर रोजी संपणारे कॅलेंडर वर्ष; ]

तीन) वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ति योजना दिनांक १ जुलै १९६३ पासून अंमलात येईल.

---

x सुधारपत्र क्र. ५२, दिनांक २२ डिसेंबर १९८६ अन्वये बदली दाखल.

= सुधारपत्र क्र. ४९, दिनांक २ जानेवारी १९८६ अन्वये सुधारित. दिनांक १ जानेवारी १९८६ पासून अंमलबजावणी.

२. शारीरिक पात्रता :

एखाद्या कर्मचा-याची नियुक्ती अल्प रजामुदती रिक्त पदावर किंवा अल्प-मुदतीच्या पदावर झाली असेल त्याचा अपवाद करता, प्रत्येक कर्मचा-यास, नियुक्तीच्या वेळी किंवा नियुक्त दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत, सेवा-विनियमांतील अनुसूची चौदामध्ये विहित करण्यात आलेल्या शारीरिक पात्रते-संबंधीच्या मानकांची पूर्ती करावी लागेल. मात्र, विशेष प्रकरणी, सक्षम अधि-का-याला हा कालावधी आणखी तीन महिन्यांपर्यंत वाढवून देता येईल. आवश्यक वैद्यकीय प्रमाणपत्राशिवाय नियुक्त केलेल्या किंवा सेवेत ठेवण्यात आलेल्या उमेद-वारांना अस्थायी कर्मचारी समजण्यात यावे आणि अशा उमेदवारांची सेवा १५ दिवसांची नोटीस देऊन समाप्त केली जाऊ शकेल.

टीप :

क) जे उमेदवार मंडळाच्या सेवेत चालू राहण्याची शक्यता असेल त्यांची शारीरिक तपासणी होणे अत्यावश्यक आहे. कंत्राटी कर्मचारी किंवा अल्पमुदतीसाठी किंवा रजामुदती रिक्त पदां-वर नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचा-यांच्या बाबतीत नियुक्ति अधिका-याने वैद्यकीय तपासणीचा आग्रह धरू नये.

ख) नियुक्तीसाठी निवड केलेल्या उमेदवारांच्या बाबतीत विहित शारीरिक पात्रतेसंबंधीच्या मानकांची पूर्तता होते याची खात्री करून घेण्यासाठी, सक्षम अधिका-याने अन्यथा निदेश दिला नाही तर, खालील सक्षम वैद्यकीय अधिका-यांकडून त्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात येईल :

| सक्षम वैद्यकीय अधिकारी | पदांचे प्रवर्ग |
|---|---|
| x१. वैद्यकीय सल्लागार | वेतनगट एक मधील सर्व आणि मुंबई मंडळाचे मुख्यालय जोपर्यंत मुंबईत असेल तोपर्यंत मुंबई मंडळाखालील कार्यालयांतील व मुख्य कार्यालया-तील वेतनगट दोन, तीन व चार यांतील पदां वरील उमेदवार. |
| २. प्रभारी वैद्यकीय अधिकारी, कामा व ऑलब्लेस रुग्णालय | मुंबईतील कार्यालयांमधील पदांवर नियुक्ती करण्यात येणारे स्त्री उमेदवार. |
| ३. प्रभारी वैद्यकीय अधिकारी, शासकीय रुग्णालये/छुटीर रुग्णालये/तालुका मुख्यालय असलेल्या ठिकाणचे जिल्हा परिषदेचे दवाखाने. | क्षेत्रीय कार्यालयांतील वेतनगट दोन, तीन व चार मधील पदांवरील उमेदवार (ज्या विद्युत केंद्रांच्या ठिकाणी मंडळाचे दवाखाने डॉक्टरांच्या प्रभाराखाली आहेत ते वगळून); |

---

x सुधारपत्र क्र. ११, दिनांक १६ ऑगस्ट १९६९ अन्वये जादा दाखल.

| सक्षम वैद्यकीय अधिकारी | पदांचे प्रवर्ग |
| --- | --- |
| ४. खापरखेडा, बल्लारशा, पारस, नाशिक, भुसावळ, पोफळी व परळी या ठिकाणच्या मंडळाच्या दवाखान्यांचे प्रभारी डॉक्टर. | विद्युत केंद्रांतील वेतनगट दोन, तीन व चार यांतील सर्व पदांवरील उमेदवार. |

टीप : विद्युत केंद्रांमध्ये पदस्थापित करण्यात आलेल्या वेतनगट दोन-मधील अधिका-यांना तेथील वैद्यकीय अधिका-यांकडे पाठवावे. वैद्यकीय अधिका-याची नेमणूक झालेली नसल्यास त्यांना संबंधित जिल्हा शल्यचिकित्सकाकडे पाठवण्यात यावे.

| | |
| --- | --- |
| ५. प्रभारी वैद्यकीय अधिकारी, (शासकीय) जिल्हा रुग्णालये/ कुटीर रुग्णालये/शासकीय पदावर नियुक्त करावयाच्या स्त्री उमेदवारांची तपासणी करण्याची पुरेशी व्यवस्था असलेले जिल्हा परिषदांचे तालुका मुख्यालयांच्या ठिकाणचे दवाखाने. | क्षेत्रीय कार्यालयांतील वेतनगट तीन व चार यांतील स्त्री कर्मचारी. |

दोन) ज्या कर्मचा-याला मंडळाच्या सेवेतून वयनिवृत्त झाल्यानंतरही, तो शारीरिकदृष्टया पात्र आहे या शर्तीवर, मंडळाच्या सेवेत चालू राहण्यास मंडळ परवानगी देईल त्यावेळी त्यानेदेखील वरील परिच्छेदात निर्दिष्ट करण्यात आलेल्या वैद्यकीय अधिका-याकडून शारीरिक पात्रता प्रमाणपत्र मिळवणे आवश्यक असेल.

ø तीन) शारीरिक पात्रता तपासणीसाठी पाठवण्यात येणा-या कर्मचा-यांना किंवा भावी कर्मचा-यांना (केवळ क्ष-किरणांच्या साहाय्याने केलेल्या छातीच्या तपासणीच्या कागदपत्रांऐवजी) छातीचा क्ष-किरण अहवाल सादर करावा लागेल आणि यासाठी कोणताही खर्च आल्यास तो संबंधित कर्मचा-याला करावा लागेल.

नियुक्तीच्या पहिल्यावेळी वैद्यकीय तपासणी करून घेणा-या कर्मचा-याला किंवा उमेदवाराला प्रवासभत्ता देय नसेल. वैद्यकीय तपासणी करावयास लावलेल्या कर्मचा-यांची कार्यालयातील अनुपस्थिती ही त्यांची कामावरील उपस्थिती मानण्यात यावी.

चार) वैद्यकीय तपासणीची विद्यमान प्रथा ही,

क) मुख्य कार्यालयात व मुंबई मंडल कार्यालयात नियुक्ती करावयाच्या वेतनगट एक व दोन मधील पदांवरील उमेदवार आणि वेतनगट तीन व चार यांतील कर्मचारीवर्ग यांसाठी वैद्यकीय सल्लागार -

आणि

---

ø सुधारपत्र क्र. ३, दिनांक ३० जून १९७७ अन्वये दाखल केले.

छ) खापरखेडा, बल्लारशा, पारस, ×(पोफळी, परळी, भुसावळ व नाशिक) येथील मंडळाचे दवाखाने आणि त्याचप्रमाणे भावी काळात ज्या ठिकाणी मंडळाचे असे दवाखाने उघडण्यात येतील ते दवाखाने यांचे प्रभारी डॉक्टर,-

यांना खालीलप्रमाणे तपासणी फी देऊन, ालू ठेवण्यात येईल :

वेतनगट एक व दोन मधील कर्मचारी - xx रु. २०

वेतनगट तीन व चार मधील कर्मचारी - xx रु. १०

वरील फीची रक्कम, प्रकरणपरत्वे, वैद्यकीय सल्लागारास किंवा वैद्यकीय अधिका-यास मंडळ परस्पर देईल.

पाच) मुंबई शासनाने (विद्यमान महाराष्ट्र शासन), आपला शासन निर्णय क्र. एलएसजी अँड पी.एच. क्र. पीपीसी/१०५५-एस, दिनांक ८ डिसेंबर १९५५ अन्वये, मुंबई राज्य विद्युत मंडळाने (आता महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ) सेवेत घेतलेल्या उमेदवारांना वर निर्दिष्ट केलेल्या फीच्या दरात शारीरिक पात्रता प्रमाणपत्र देण्यास इलाखा शहर शल्यचिकित्सक, मुंबई व सर्व जिल्हा शल्यचिकित्सक यांना, परवानगी दिली आहे. (मुख्य कार्यालय, मुंबई; मुंबई येथील मंडल कार्यालय, खापरखेडा, बल्लारशा, पारस, पोफळी, भुसावळ, परळी व नाशिक विद्युत केंद्रांची कार्यालये यांचा अपवाद करता) निरनिराळ्या कार्यालयांच्या युनिट प्रमुखांनी, मंडळाचे कर्मचारी व भावी कर्मचारी यांना, परिशिष्ट-क मधील नमुन्यानुसार परिचय पत्र (लेटर ऑफ कॉन्फिडन्स) देऊन, संबंधित जिल्हा शल्यचिकित्सकाकडे पाठवावे. शासकीय वैद्यकीय अधिका-याला फी आकारणे सुलभ व्हावे यासाठी त्या कर्मचा-याचा वेतनगट त्यात नमूद करण्यात यावा.

<u>टीप</u> : या प्रयोजनास्तव, वेतनगट एक, दोन, तीन व चार यांतील मंडळाच्या कर्मचा-यांना अनुक्रमे राज्य शासनाच्या सेवेतील वर्ग एक, दोन, तीन व चार यांतील कर्मचारी मानण्यात यावे.

=[प्रकरणपरत्वे, वैद्यकीय सल्लागार व वैद्यकीय अधिकारी यांना कर्मचा-यांनी वैद्यकीय तपासणीसाठी द्यावयाच्या फीच्या दरात सुधारणा करण्याचे अधिकार मंडळाने अध्यक्षांना दिले आहेत.]

सहा) वैद्यकीय सल्लागार व मंडळाच्या दवाखान्यांतील वैद्यकीय अधिकारी यांनी परिशिष्ट "ख" मधील नमुन्यात शारीरिक पात्रता प्रमाणपत्र द्यावे.

---

× सुधारपत्र क्र. २१, दिनांक २३ फेब्रुवारी १९७३ अन्वये जादा दाखल.

xx सुधारपत्र क्र. २१, दिनांक २० फेब्रुवारी १९७३ अन्वये दरांमध्ये सुधारणा.

= सुधारपत्र क्र. २१, दिनांक २३ फेब्रुवारी १९७३ अन्वये जादा दाखल.

३. <u>वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती</u> :

क) एक) मंडळाचे दवाखाने ज्या ठिकाणी आहेत त्या ठिकाणचे कर्मचारी [१](व राज्य कर्मचारी विमा अधिनियम/योजना लागू असणारे कर्मचारी) यांचा अपवाद करून, संपूर्ण महाराष्ट्र राज्यातील मंडळाचे कर्मचारी व त्यांच्या [२](कुटुंबातील व्यक्ती) यांच्या प्रत्यक्ष खर्चाची प्रतिपूर्ती (प्रसूति खर्चासह) करताना वार्षिक [३](रु. १०००) ही मर्यादा राहील.

[३](वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीची मागणी न केलेली रक्कम कर्मचा-यास त्याच्या सेवानिवृत्तीपर्यंत साठवून ठेवता येईल. तो सेवानिवृत्त झाल्या-वरच ही रक्कम व्यपगत होईल.)

[४](मंडळाच्या कर्मचा-यास, वैद्यकीय भत्ता योजना किंवा वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ति योजना याबाबत विकल्प देता येईल. हा विकल्प त्याला संपूर्ण सेवाकाळात केवळ एकदाच देता येईल आणि विद्युत केंद्राच्या ठिकाणी त्याची बदली झाल्यास तेवढा काळ वगळता, हा विकल्प संपूर्ण सेवेत त्याच्यावर बंधनकारक असेल.)

<u>टीप</u> : १) या प्रयोजनास्तव "कर्मचारी" म्हणजे मंडळाच्या नियमित आस्थापनेवरील स्थायी [५](व अस्थायी कर्मचारी).

<u>टीप</u> : २) सुधारपत्र क्र. ३०, दिनांक ४ डिसेंबर १९७५ अन्वये, ज्यांची निवड सक्षम निवड मंडळाकडून करण्यात आली असेल व दिनांक १ एप्रिल १९७५ रोजी किंवा त्या-नंतर त्यांची किमान १ वर्ष अखंड सेवा झाली असेल अशा तात्पुरत्या कर्मचा-यांच्या सेवा केवळ निर्बाध पदांच्या अभावी नियमित करण्यात आल्या नसल्या तरी त्यांना वैद्यकीय खर्च प्रतिपूर्तीची योजना लागू होईल. दिनांक १ एप्रिल १९७५ नंतर कधीही अशा ज्या तात्पुरत्या कर्मचा-यांची १ वर्षाची अखंड सेवा होईल तेव्हापासून ते ज्या [६](कॅलेंडर) वर्षात अशी सेवा पूर्ण करतील त्या [६](कॅलेंडर) वर्षात यथाप्रमाण दराने लाभ मिळण्यास व त्यानंतर पूर्ण लाभ मिळण्यास पात्र असतील.

---

१. सुधारपत्र क्र. ३६, दि. १६ जानेवारी १९७८ अन्वये निर्दिष्ट.
२. सुधारपत्र क्र. ५२, दि. २९ डिसेंबर १९८६ अन्वये बदली दाखल.
३. सुधारपत्र क्र. ४९, दि. २ जानेवारी १९८६ अन्वये सुधारित.
४. सुधारपत्र क्र. ५०, दि. २९ एप्रिल १९८६ अन्वये जादा दाखल.
५. सुधारपत्र क्र. ३०, दिनांक ४ डिसेंबर १९७५ अन्वये अंतर्भूत.
६. सुधारपत्र क्र. ४९, दि. २ जानेवारी १९८६ अन्वये सुधारित.

. . ६/-

टीप : ३) मंडळाचे दवाखाने ज्या ठिकाणी आहेत तेथील कर्मचा-यांचा अपवाद करता, मंडळाचा ठराव क्र. १७९३, दिनांक ११ डिसेंबर १९८५ अनुसार काढण्यात आलेले सोबत जोडलेले सुधारपत्र क्र. ४९, दिनांक २ जानेवारी १९८६ व मंडळाचा ठराव क्र. १२९, दिनांक २३ एप्रिल १९८६ अनुसार काढण्यात आलेले सुधारपत्र क्र. ५०, दिनांक २९ एप्रिल १९८६ अनुसार वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीबाबत नवीन योजना अंमलात आलेली आहे.

=दोन) [मंडळाच्या विद्युत केंद्रांतील जे कर्मचारी विद्युत केंद्रांच्या वसाहतीत वास्तव्य करीत नसतील व त्यामुळे त्यांना वैद्यकीय उपचारासाठी तेथील दवाखान्यात जाणे गैरसोयीचे ठरत असेल तर, त्या कर्मचा-यांना वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ती योजनेचा लाभ देण्यात येईल. मात्र, अशा कर्मचा-यांनी कोणत्याही वेळी त्या ठिकाणच्या दवाखान्यात उपचार करून घेतल्यास, प्रकरणपरत्वे, ७[अधीक्षक अभियंता (निर्मिती)] किंवा [वरिष्ठ कार्यकारी अभियंता (निर्मिती)] त्या भागात फीचा जो दर प्रचलित असेल तो विचारात घेऊन, फीचा जो दर विहित करतील त्या दराने त्या कर्मचा-यांकडून फीची रक्कम वसूल करण्यात यावी.]

तीन) पती व पत्नी दोघेही मंडळाच्या सेवेत असतील त्याबाबतीत, ते दोघेही वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती स्वतंत्रपणे मिळण्यास पात्र असतील.

चार) प्रत्येक कर्मचा-याला, त्याच्या सेवावधीत वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्ती संबंधातील नोंदी तसेच अधिदान अधिका-याने (पेईंग ऑफिसर) रक्कम देण्यापूर्वीच्या आवश्यक नोंदी करण्यासाठी, सचिव ठरवून देईल अशा नमुन्यातील योग्य अशी दैनंदिनी कार्यालयीन खर्चाने देण्यात येईल.

पाच) विकृतीचिकित्सा (ॲलोपथी), समचिकित्सा (होमियोपथी), आयुर्वेदिक अथवा युनानी यांपैकी कोणत्याही पद्धतीने कर्मचा-यांना वैद्यकीय उपचार करून घेता येतील; मात्र असे उपचार त्यांनी नोंदणीकृत वैद्यक व्यवसायीकडून करून घेतले पाहिजेत.

---

= सुधारपत्र क्र. २, दिनांक ५ जानेवारी १९६५ अन्वये जादा दाखल.

७ स.आ.क्र. १४ (कर्मचारीवर्ग), दिनांक ११ एप्रिल १९६३ यासाठी काढण्यात आलेल्या सुधारपत्र क्र. ३७, दिनांक २४ फेब्रुवारी १९८८ अन्वये "वरिष्ठ विद्युतकेंद्र अधीक्षक" व "विद्युत केंद्र अधीक्षक" या पदनामाऐवजी वरील नवीन पदनामे घेण्यात आली.

सहा) ज्या ठिकाणी मंडळाचा स्वत:चा दवाखाना आहे अशा ठिकाणाहून ज्या ठिकाणी असा दवाखाना नसेल अशा ठिकाणी एखाद्या कर्मचा-याची बदली करण्यात आल्यास त्याला यथाप्रमाण वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती मिळण्याचा हक्क असेल आणि ज्या तारखेपासून त्याला कार्यमुक्त करण्यात येईल त्या तारखेपासून °[- - - - - - - - - - - -] वैद्यकीय भत्त्याची प्रतिपूर्ती मिळेल.

जोपर्यंत एखादे औषध, एखादी शल्यचिकित्सा किंवा वैद्यकीय तपासणी नोंदणीकृत वैद्यक व्यवसायी विहित करील तोपर्यंत असे औषध, अशी शल्यचिकित्सा किंवा वैद्यकीय तपासणी याबाबत कोणतेही बंधन असणार नाही आणि यात दंतोपचार, नेत्रोपचार व इतर शारीरिक उपचार यांचा अंतर्भाव असेल.

सात) एखाद्या कर्मचा-याची ×(कॅलेंडर) वर्षात मध्येच बदली झाल्यास त्याला °[- - - - - - - - - - - -] वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीची यथाप्रमाण रक्कम मिळेल. परंतु, त्याने प्रतिपूर्तीची पूर्ण रक्कम घेतली असेल तर ×(कॅलेंडर) वर्षातील उरलेल्या कालावधीत त्याला कोणतीही प्रतिपूर्ती मिळणार नाही.

> ¤टीप : तशीच परिस्थिती उद्भवल्यास, या सर्वसाधारण आदेशाच्या प्रयोजनास्तव, त्या त्या वेळी कोणत्याही विद्युत केंद्रातील मंडळाचा दवाखाना "अस्तित्वात नाही" असे ÷(वैद्यकीय सल्लागाराशी विचारविनिमय करून सचिव) घोषित करू शकतील.

मात्र, ज्या ठिकाणी मंडळाचा दवाखाना असेल अशा ठिकाणी एखाद्या कर्मचा-याची बदली झाल्यास, तो कर्मचारी पूर्वी ज्या ठिकाणी होता त्या ठिकाणी त्याने °[- - - - - - - - - - -] प्रतिपूर्तीची पूर्ण रक्कम घेतली असली तरी तो अशा दवाखान्यात उपचार करून घेऊ शकेल.

---

° सुधारपत्र क्र. ७६, दिनांक २० जानेवारी १९८२ अन्वये एकच दर देण्यास सुरुवात झाल्याने नको असलेला मजकूर वगळण्यात आला.

× सुधारपत्र क्र. ४९, दिनांक २ जानेवारी १९८६ अन्वये बदली दाखल.

¤ सुधारपत्र क्र. १६, दि. ५ जुलै १९७१ अन्वये जादा दाखल.

÷ सुधारपत्र क्र. १७१, दि. ३ मार्च १९७६ अन्वये अधिकार प्रदानात बदल.

=आ०) वरीलप्रमाणे केलेल्या प्रतिपूर्तीखेरीज, मंडळ, ज्या ठिकाणी मंडळाचे दवाखाने आहेत ती ठिकाणे वगळता, संपूर्ण महाराष्ट्र राज्य तील आपल्या कर्मचा-यांना, खाली निर्दिष्ट केलेल्या मोठ्या आजा संबंधातील वैद्यकीय आणि/अथवा शल्यचिकित्साविषयक उपचारांवर के प्रत्यक्ष खर्चांच्या ५० टक्के इतक्या खर्चाची प्रतिपूर्ती करील; मात्र अ उपचार शासकीय किंवा निमशासकीय रुग्णालयांच्या सर्वसाधारण कक्ष मध्ये केलेले असले पाहिजेत.

xxजर शासकीय किंवा निमशासकीय रुग्णालयातील अधिकार त्यांच्या रुग्णालयात जागा नाही असे प्रमाणित करतील व त्यामुळे त्यांनी शिफारस केल्यानुसार खाजगी रुग्णालयात उपचार करून घ्याव असा निदेश देतील त्यावेळी त्या खाजगी रुग्णालयात घेतलेल्या वैद्यकी औषधोपचारावर झालेल्या प्रत्यक्ष खर्चाच्या ५० टक्के इतकी प्रतिपूर्ती करण्यात यावी.

## गंभीर वैद्यकीय आजार

विषमज्वर

न्युमोनिआ

सांसर्गिक हेपाटिसीस

पित्ताशयशोथ (कोलेसायस्टीसीस)

वृक्कशोथ (नेफ्रीटीस)

स्वादुपिंडशोथ (पॅन्क्रियाटीस)

मस्तिष्कशोथ (ॲन्सिफिलिटीस) आणि

मस्तिष्कावरणशोथ (मेनिन्जायटीस)

रक्तस्त्रावी प्रमस्तिष्क घनास्त्रता<br>(हॅम्रेजिक सेरेब्रल थ्रॉम्बोसिस)

परिहृद (धमनी) घनास्त्रता<br>(कॉरोनरी थ्रॉम्बोसिस)

हत्तीरोग

हिवताप

जठरांत्रशोथ (गॅस्ट्रोॲन्टेरिटीस)

---

= सुधारपत्र क्र. १३, दि. ९ जुलै १९७० अन्वये जादा दाखल. दिनांक १ एप्रिल १९७० पासून अंमलबजावणी.

xx सुधारपत्र क्र. २४, दि. १५ ऑक्टोबर १९७३ अन्वये जादा दाखल.

नारू (गिनी वर्म)

पांडुरोग (शासकीय प्रयोगशाळेकडून रक्तपेशीगणन (ब्लड काउंट) करून प्रमाणित केल्यास)

x[घटसर्प (डिप्थेरिआ)]

xx[अतिरक्तदाब (हायपरटेन्शन)]

## शस्त्रक्रिया करावा लागणा-या रोगाचे आजार

१) अंतर्गळ (हर्निया), अंडवृद्धि (हायड्रोसिल)

२) टॉन्सिलेक्टॉमी

३) हेमॉरहॉइडोटॉमी

४) आंत्रपुच्छ-उच्छेदन (ॲपेन्डीसेक्टॉमी)

५) आंत्र-शस्त्रक्रिया (इन्टेस्टिनल ऑपरेशन्स)

६) स्त्रीरोगविषयक शस्त्रक्रिया (फिमेल गायनेक ऑपरेशन्स)

≠ (७) मानवी हृदयातील झडप बदलण्याची शस्त्रक्रिया (रिप्लेसमेंट ऑफ व्हॉल्व्ह इन हयूमन हार्ट ऑपरेशन)

ø (८) हृदोधिकठउच्छेदन शस्त्रक्रिया (थायमेक्टॉमी ऑपरेशन)

ø [(९) मूतखडा शस्त्रक्रिया (युरेटरी स्टोन ऑपरेशन)

१०) मल्टिपल - फिब्रॉइड युटेरिन ॲंड सर्व्हिकल फिब्रॉइडस ॲंड अम्बिलिकल हर्निया शस्त्रक्रिया

११) ॲक्टोपिक गर्भधारणा शस्त्रक्रिया (ॲक्टोपिक प्रेग्नन्सी ऑपरेशन)]

---

x सुधारपत्र क्र. १३, याचे पूरकपत्र दि. ३१ मार्च १९७३ अन्वये अंतर्भूत.

xx सुधारपत्र क्र. २०, दि. ३० डिसेंबर १९७२ अन्वये अंतर्भूत.

≠ सुधारपत्र क्र. ४०, दि. ३० जुलै १९७९ अन्वये जादा दाखल.

ø सुधारपत्र क्र. ४४, दि. ६ डिसेंबर १९८० अन्वये जादा दाखल.

[ टीप : १) "मानवी हृदयातील झडप बदलण्याची शस्त्रक्रिया" व त्यासंबंधात देय असलेली खर्चाची प्रतिपूर्ती यासाठी सोबत जोडलेले सुधारपत्र क्र. ४०, दिनांक ३० जुलै १९७९ पाहावे;

आणि

२) वैद्यकीय गंभीर आजार व शस्त्रक्रिया करावे लागणारे रोग यासाठी खाजगी रुग्णालयात केलेल्या उपचारांबाबत देण्यात येणाऱ्या २५ टक्के वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्ती-करिता सोबत जोडलेले सुधारपत्र क्र. ४४, दि. ६ डिसेंबर १९८० पाहावे. ]

ø[ (ख) मंडळाच्या, वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ती योजनेअन्वये तयार करण्यात आलेल्या नियमांच्या कक्षेत स्पष्टपणे न येणाऱ्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या प्रकरणांवर निर्णय घेऊन त्यांबाबत मंजुरी देण्यासाठी, मंडळाचा सदस्य (प्रशासन) व वैद्यकीय सल्लागाराशी विचारविनिमय करून तसे करण्याचा अधिकार लेखा सदस्याला देण्यात आला आहे. ]

=[ (ख) १) क्षयरोग/कर्करोग/कुष्ठरोग आणि सर्वसाधारण आदेश क्र. २०, दिनांक १७ जून १९६३ याच्या सुधारपत्र क्र. १३ मध्ये अंतर्भूत असलेले अन्य गंभीर वैद्यकीय आजार/शस्त्रक्रिया कराव्या लागणाऱ्या रोगांचे आजार यांचा अपवाद करून, मंडळ, कर्मचाऱ्याने, संबंधित दवाखान्याच्या वैद्यकीय अधिकाऱ्याच्या सल्ल्याने स्वतःवर आणि/किंवा त्याच्या x(कुटुंबातील पूर्णपणे अवलंबून असलेल्या व्यक्तींवर) शासकीय किंवा निमशासकीय रुग्णालयांमध्ये करून घेतलेल्या उपचारापोटी त्याने केलेल्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीला मंजुरी देण्यास विद्युतकेंद्र प्रमुखांना अधिकार प्रदान करीत आहे. ]

४. मंडळाचे दवाखाने :

एक) २५० पेक्षा अधिक कर्मचारीवर्ग असणाऱ्या प्रत्येक प्रमुख विद्युत केंद्राच्या ठिकाणी ते कर्मचारी व x[ कुटुंबातील त्यांच्यावर पूर्णपणे अवलंबून असलेल्या व्यक्ती ] यांच्या वैद्यकीय गरजा भागवण्यासाठी एक सुसज्ज दवाखाना असेल, तेथे एक पूर्णवेळ डॉक्टर व दवाखाना कार्यक्षमतेने चालवण्यासाठी पुरेसा इतर कर्मचारीवर्ग असेल.

---

ø सुधारपत्र क्र. ४३, दि. ९ सप्टेंबर १९८० अन्वये जादा दाखल. दिनांक १ जानेवारी १९७६ पासून अंमलबजावणी.

= सुधारपत्र क्र. ३३, दिनांक १८ डिसेंबर १९७६ अन्वये जादा दाखल.

x सुधारपत्र क्र. ५२, दिनांक २९ डिसेंबर १९८६ अन्वये बदली दाखल.

दोन) या दवाखान्यांतील डॉक्टरांच्या पदांच्या वेतनश्रेणी खालील-प्रमाणे असतील :

| | | |
|---|---|---|
| गट एक – | ज्या ठिकाणच्या नियमित आस्थापनेवर २५० कर्मचारी असतील त्या ठिकाणचे दवाखाने. | रु. ६५०–५०–८५०–रोध–५०–११०० |
| गट दोन – | ज्या ठिकाणच्या नियमित आस्थापनेवर २५० पेक्षा कमी कर्मचारी असतील त्या ठिकाणचे दवाखाने. | रु. ४५०–३०–६००–रोध–४०–८०० |

ज्यावेळी एखाद्या विद्युत केंद्राच्या नियमित आस्थापनेवरील कर्मचारी संख्या २५० पेक्षा अधिक होईल तेव्हा, रु. ४५०–३०–६००–रोध–४०–८०० या वेतनश्रेणीतील डॉक्टरला रु. ६५०–५०–८५०–रोध–५०–११०० या वेतनश्रेणीत सामावून घेण्यात येईल.

तीन) जेव्हा पूर्णवेळ डॉक्टर उपलब्ध होत नसेल तेव्हा, वर विहित केलेल्या वेतनश्रेणीच्या आधारे, सर्व भत्त्यांसह नियत वेतनावर अर्धवेळ डॉक्टर नियुक्त करता येईल. मंडळामध्ये अर्धवेळ डॉक्टर नियुक्त करण्याच्या अटी व शर्ती परिशिष्ट– ग मध्ये निर्दिष्ट केल्या आहेत.

चार) दवाखान्यात काम करणारा डॉक्टर नैमित्तिक रजेवर जाईल तेव्हा त्याने अन्य स्थानिक डॉक्टरच्या सेवा उपलब्ध होतील अशी व्यवस्था केली पाहिजे व त्या डॉक्टरला मंडळाच्या दवाखान्यात सेवा पुरवण्याबद्दल प्रतिदिन रु. १०/– इतकी फी देता येईल. मंडळाने आपल्या दवाखान्यात नियुक्त केलेल्या डॉक्टरला अर्जित रजेवर जावयाचे असेल तेव्हा, मंडळाचा दवाखाना ज्या विद्युत केंद्राच्या ठिकाणी आहे त्याच्या प्रभारी अधिकाऱ्यास मंडळाच्या वैद्यकीय सल्लागाराच्या शिफारशीने, कायम डॉक्टर ज्या वेतनश्रेणीत काम करीत असेल त्या वेतनश्रेणीच्या किमान वेतनाइतक्या नियत वेतनावर स्थानिक डॉक्टरची नियुक्ती करता येईल.

×जेव्हा एखादा वैद्यकीय अधिकारी/सहायक वैद्यकीय अधिकारी रजेवर जाईल किंवा तशीच परिस्थिती निर्माण होईल तेव्हा पूर्ण वेळ डॉक्टर उपलब्ध होत नसेल तेव्हा, वैद्यकीय अधिकाऱ्याच्या पदासाठी विहित केलेल्या वेतनश्रेणीच्या आधारे, एखादा स्थानिक डॉक्टर सर्व भत्त्यांसह नियत वेतनावर अर्धवेळ सेवेत घेण्याचा अधिकार वैद्यकीय सल्लागारास असेल.

---

× सुधारपत्र क्र. २५, दि. ३० जून १९७४ अन्वये जादा दाखल.

पाच) ज्या विद्युत केंद्राच्या ठिकाणी मंडळाचे दवाखाने आहेत त्या
ठिकाणच्या प्रभारी अधिकाऱ्याला, आसपास साथरोगाची लागण
झाल्यास एका वेळी औषधांच्या अनुसूचीमध्ये अंतर्भूत नसलेली, १००
रुपयांपर्यंतची औषधे, इंजेक्शने इत्यादींची खरेदी करता येईल; मात्र,
असा प्रभारी अधिकारी, ज्या ज्या वेळी अशा अधिकारांचा वापर
करील त्या त्या वेळी त्यासाठी सचिवांची कार्योत्तर मंजुरी (एक्स-
पोस्ट-फॅक्टो सँक्शन) घेईल.

=[ मंडळाने, मंडळाचे दवाखाने ज्या ठिकाणी आहेत अशा आठ
विद्युत केंद्रांना औषधे/औषधिद्रव्ये खरेदी करण्यासाठी खालीलप्रमाणे
वार्षिक खर्चाला मंजुरी दिली आहे :

| अनुक्रमांक | विद्युत केंद्राचे नाव | रक्कम ( रुपये ) |
|---|---|---|
| १. | खापरखेडा | १,००,००० |
| २. | पारस | ९०,००० |
| ३. | बल्लारशा | ५०,००० |
| ४. | भुसावळ | १,५०,००० |
| ५. | परळी-वैजनाथ | १,२०,००० |
| ६. | नाशिक | २,००,००० |
| ७. | पोफळी | ७०,००० |
| ८. | कोराडी | २,६०,००० ] |

मंडळाने आणखी असाही निदेश दिला आहे की, विहित
मर्यादेपेक्षा खर्च अधिक झाल्यास, °[ वैद्यकीय सल्लागाराशी विचार-
विनिमय करून सचिवांनी ] या जादा खर्चाला मंजुरी द्यावी असे
अधिकार त्यांना प्रदान करण्यात आलेले असल्याने त्यासाठी मंजुरी
मिळण्याकरिता xx[ अधीक्षक अभियंता (निर्मिती)/वरिष्ठ कार्यकारी
अभियंता (निर्मिती) ] याने तशा अर्थाचा आवश्यक तो प्रस्ताव मुख्य
कार्यालयाला पाठवला पाहिजे.

= कार्यालयीन. पत्र क्र. जीएडी/जीइएन/एमइडी/३४०६७, दि. २८ जुलै १९८२
अन्वये बदल दाखल. दि. १ एप्रिल १९८२ पासून अंमलबजावणी.

° सुधारपत्र क्र. २७१, दि. ३ मार्च १९७६ अन्वये अधिकार प्रदानात बदल.

xx स.आ.क्र. ७४ (कर्मचारीवर्ग), दि. ११ एप्रिल १९६३ यासाठी काढण्यात
आलेल्या सुधारपत्र क्र. ३७, दिनांक २४ फेब्रुवारी १९८८ अन्वये "वरिष्ठ
विद्युत केंद्र अधीक्षक" व "विद्युत केंद्र अधीक्षक" या पदनामांऐवजी वरील नवीन
पदनामे घालण्यात आली.

सहा) रोगाची साथ आल्यास सामान्यत: सार्वजनिक आरोग्य विभाग औषधांचा व लसींचा मोफत पुरवठा करीत असते; म्हणून प्रभारी अधिका-यानें, त्याला औषध खरेदीसाठी दिलेल्या अधिकारांचा वापर करण्यापूर्वी, त्या सवलतीचा लाभ घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

५. इतर सवलती :

केवळ क्षयरोग व कर्करोग यांच्या संबंधात उपचार करण्यासाठी खाली तपशील दिल्याप्रमाणे कर्मचा-यांना आणखी सवलती देण्यात येतील :

क) क्षयरोग :

हा रोग क्रियाशील असेल तेव्हा--

एक) x[ - - - - - - - - - - - - ] मंडळाच्या क्षयरोगग्रस्त कर्मचा-याला, मंडळाच्या सामान्य नियमांनुसार अनुज्ञेय असलेली सरासरी वेतनावरील सर्व रजा संपल्यानंतर, सरासरी वेतनावरील क्षयरोगासाठीची विशेष रजा देण्यात यावी आणि त्या संबंधातील रजा वेतन सामान्य नियमांच्या आधारे नियमित करण्यात यावे. ही एकूण विशेष रजा १ वर्षापेक्षा अधिक असणार नाही व त्या कर्मचा-याच्या खाती शिल्लक असलेली सरासरी वेतनावरील रजा संपेल त्या तारखेपासून अशा रजेची गणना करण्यात येईल. ही विशेष रजा संपल्यानंतर, तो बरा होण्यासाठी त्याला आणखी रजेची आवश्यकता असेल तर, देय असल्यास, अर्ध सरासरी वेतनावरील रजा त्याला मंजूर करण्यात यावी. अर्ध सरासरी वेतनावरील रजा संपल्यानंतर अशा कर्मचा-याची नोकरी पुढे चालू राहावी यासाठी त्याच्या शारीरिक पात्रतेची तपासणी करण्यासाठी त्याला ∅जिल्हा शल्यचिकित्सक/जिल्हा रुग्णालयातील क्षयरोग विशेषज्ञ/मुंबई येथील शासकीय रुग्णालयातील क्षयरोग विशेषज्ञ/वैद्यकीय सल्लागार याच्याकडे पाठवण्यात यावे आणि तो तसा निदेश देईल तर त्याला असाधारण रजा मंजूर करण्यात यावी; मात्र, या नियमान्वये अशी रजा मंजूर करताना असा कर्मचारी क्षयरोगी म्हणून रजेवर गेल्यापासूनचा रजेचा कालावधी तीन वर्षांपेक्षा अधिक झालेला नसला पाहिजे.

---

x सुधारपत्र क्र. ३९, दि. २३ ऑगस्ट १९७८ अनुसार वरील मजकूर वगळण्यात आला. क्षयरोग/कुष्ठरोग/कर्करोग याबाबत वेतनगट एक व दोन यांतील अधिका-यांना देण्यात येणा-या विशेष रजेसंबंधातही हे सुधारपत्र पहावे.

∅ सुधारपत्र क्र. २८, दि. २१ ऑगस्ट १९७१ अन्वये सुधारित.

न

दोन) * (वगळला)

तीन) ज्या क्षयरोग चिकित्सालयात रोग्याची तपासणी झाली असेल त्या चिकित्सालयाकडून कर्मचा-याला, खाली दिलेल्या, एकतर शासकीय रुग्णालयातून किंवा निमशासकीय संघटनांकडून चालवल्या जाणा-या रुग्णालयातून उपचार करून घेता येतील :

क) कोणतेही शासकीय क्षयरोग रुग्णालय.

ख) सर्वोदय हॉस्पिटल, घाटकोपर, मुंबई.

ग) गो. ते. रुग्णालय, मुंबई.

घ) ज. जी. गट रुग्णालये, मुंबई.

च) क्षयरोग आरोग्यधाम, तळेगाव.

छ) क्षयरोग आरोग्यधाम, वानलेसवाडी, मिरज.

ज) डॉ. द्रीपड रुग्णालय, नागपूर.

झ) डॉ. गुमास्ता रुग्णालय, नागपूर.

×ट) मंडळाचे दवाखाने.

चार) कर्मचारी पुढीलप्रमाणे वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती मिळण्यास पात्र असेल :

क) ऐपी, पीपी व शस्त्रक्रिया यांसारख्या तांत्रिक उपचार-पद्धती करणा-या किंवा हाती घेणा-या संबंधित संस्थेच्या प्रमुखाने योग्यप्रकारे प्रतिस्वाक्षरित केलेली प्रमाणके सादर केल्या-नंतर, त्या खर्चाची <u>अधिक</u> क्ष-किरण व प्रयोगशाळा तपासणी आकार यांची पूर्ण प्रतिपूर्ती;

ख) औषधिद्रव्ये व औषधे यांच्या यादीत असलेली अनुज्ञेय औषध व शक्तिवर्धके यांवरील पूर्ण खर्चाची प्रतिपूर्ती;

=[ ग) °[ वेतनगट तीन व चार मधील] जो कर्मचारी क्षयरोगाने आजारी असेल तो कर्मचारी, त्याने विशेष आहारावर केलेला प्रत्यक्ष आहार खर्च कमाल रु. १०० दरमहा एवढ्या मर्यादेस अधीन राहून, सहा महिनेपर्यंत मिळण्यास पात्र असेल. परंतु, त्यासाठी

---

* सुधारपत्र क्र. ३९ दिनांक २३ ऑगस्ट १९७८ अन्वये सर्व वेतनगटांतील कर्म-चा-यांसाठी विश्व रजेची सवलत देण्यात आल्याने तेथील पूर्वीचा मजकूर वगळण्यात आला आहे.

× सुधारपत्र क्र. ११, दिनांक ३० जून १९६९ अन्वये नावा दाखल.

= सुधारपत्र क्र. ३४, दिनांक ३० जून १९७७ अन्वये बदली दाखल.

० सुधारपत्र क्र. ३९, दिनांक २३ ऑगस्ट १९७८ अन्वये सुधारित.

त्याला खाली दिलेले प्रतिज्ञापन करून द्यावे लागेल आणि हे प्रतिज्ञापन, त्याच्यावर उपचार करणा-या शल्यचिकित्सकाने किंवा रुग्णालयाच्या सक्षम अधिका-याने योग्यरीत्या प्रति-स्वाक्षरित केलेले असले पाहिजे :

प्रतिज्ञापन

याद्वारे मी, श्री/श्रीमती/कुमारी ------------------ ------------------ घोषित करतो/करते की, मी डॉ•------- ------------------ यांच्याकडून क्षयरोगावर उपचार करून घेत होतो/होते आणि त्यांच्या सल्ल्याने ------------------- हा विशेष आहार घेत होतो/होते; आणि त्यासाठी मला दिनांक ----------- पासून दिनांक ---------- पर्यंतच्या कालावधीसाठी रु• ---------------- एवढा प्रत्यक्ष खर्च आला•

सही/-

( );]

घ) रुग्णालयाला प्रदान केलेल्या खर्चाची प्रतिपूर्ती;

च) औषधोपचार करून घेण्याबद्दल अनुज्ञेय असलेल्या खर्चाची प्रतिपूर्ती ही, सहा महिन्यांपेक्षा अधिक कालावधीसाठी नसेल आणि त्यानंतर यापोटी कोणत्याही खर्चाची प्रतिपूर्ती दिली जाणार नाही•

छ) निवासस्थान ते रुग्णालय व तेथून परतीचा प्रवास करणे यासाठी कर्मचा-याला, अनुज्ञेय वर्गानुसार प्रवासभत्ता मिळेल; परंतु, त्यावेळी येणा-या कोणत्याही आनुषंगिक खर्चापोटी त्याला कोणतीही प्रतिपूर्ती मिळणार नाही;

xx[ज) खंड ५ (क) अन्वये अनुज्ञेय असलेल्या आणि शासकीय किंवा निमशासकीय नसलेल्या रुग्णालयात (म्हणजेच खाजगी रुग्णालयात) औषधोपचार करून घेणा-या कार्यशील क्षयरोग असलेल्या कर्मचा-याला, मंडळाच्या वैद्यकीय सल्लागाराबरोबर

---

xx सुधारपत्र क्र• ९, दिनांक ७ मे १९६९ अन्वये जादा दाखल•

विचार विनिमय करून वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती देण्याचा अधिकार ×[ सचिवास ] राहील. ]

ø[पाच क) क्षयरोग झालेल्या कर्मचा-याला त्याबाबतीतील सवलती एकदा देण्यात आल्या असतील व त्याच्यावर उपचार केल्यावर तो कामावर रुजू होण्यास शारीरिकदृष्टया पात्र आहे असे प्रमाणित केल्यानंतर त्याला पुन्हा क्षयरोगाची लागण झाली तर याबाबतीतील सवलती त्याला पुन्हा देता येतील.

ख) क्षयरोग झालेल्या कर्मचा-याला जिल्हा शल्यचिकित्सक/ जिल्हा रुग्णालयातील क्षयरोग विशेषज्ञ/मुंबईतील शासकीय रुग्णालयातील क्षयरोग विशेषज्ञ/वैद्यकीय सल्लागार याजकडे त्याची वैद्यकीय तपासणी करून घेण्यासाठी पाठवण्यात यावे आणि तो खालील शर्तीवर, कामावर रुजू होण्यापूर्वी त्याच्याबाबत शारीरिक पात्रता प्रमाणपत्र मिळवण्यात यावे :

तथा शर्ती अशा -

एक) तो अर्हतापात्र वैद्यक व्यवसायीच्या उचित वैद्यकीय पर्यवेक्षणाखाली राहील व आपल्यावरचे उपचार चालू ठेवील.

दोन) क्षयरोग झाल्याचा संशय असलेला अथवा संरोधित (अरेस्टेड) क्षयरोगग्रस्त कर्मचारी जिल्हा शल्यचिकित्सक/ जिल्हा रुग्णालयातील क्षयरोग विशेषज्ञ/मुंबईतील शासकीय रुग्णालयातील क्षयरोग विशेषज्ञ/वैद्यकीय सल्लागार याजकडून ठराविक कालांतराने आपली वैद्यकीय तपासणी करून घेईल. अशी वैद्यकीय तपासणी पुन्हा करून घेण्याचा खर्च मंडळाकडून करण्यात येईल.

ग) एक) क्षयरोगग्रस्त कर्मचा-याला सर्वसाधारण पद्धतीने दोन वेळा त्यासंबंधातील सवलती देण्यात याव्यात. अशा सवलती तिस-या वेळी मंजूर करताना मात्र त्याला वरील परिच्छेद (ख) मध्ये दिलेल्यापैकी एखाद्या सक्षम वैद्यकीय अधिका-याकडून "सदर कर्मचा-याने विनियम क्र. ५ (क) (पाच) यातील शर्तींचे पालन केले असले तरीही त्याला तिस-या वेळी क्षयरोगाच्या संबंधातील सवलती देणे आवश्यक आहे" अशा अर्थाचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल. तथापि, अशी प्रकरणे आदेशार्थ मुख्य कार्यालयाकडे पाठवण्यात यावीत.

---

ø [illegible] क्र. [illegible], दिनांक २१ [illegible] अन्वये [illegible] दाखल.

× सर्वसाधारण आदेश क्र. १८ (कर्मचारीवर्ग) दि.२८ मे १९६३ खालील सुधारपत्र क्र. १७१, दिनांक ३ मार्च १९७६ अन्वये अधिकार प्रदानात बदल.

ø सुधारपत्र क्र. २८, दि. २१ ऑगस्ट १९७५ अन्वये जादा दाखल.

दोन) कोणत्याही कर्मचा-याला क्षयरोगासंबंधातील या सवलती चौथ्यांदा देण्यात येणार नाहीत. चौथ्यांदा अशा सवलती मागणा-या कर्मचा-याला निःसमर्थ ठरवण्यासाठी (इन्व्हॅलिडेशन) सक्षम वैद्यकीय अधिका-याकडे पाठवण्यात यावे.]

x[ टीप : मंडळाने आपला ठराव क्र. १६३६, दिनांक २१ ऑगस्ट १९८५ अन्वये, क्षयरोगाच्या प्रकरणी अनुज्ञेय असणा-या विशेष रजेप्रमाणेच पक्षाघाताच्या (पॅरॅलिसिस) प्रकरणीही द्यावयाच्या विशेष रजे-बाबत, त्या प्रकरणाची गुणवत्ता विचारात घेऊन निर्णय घेण्याचे अधिकार अध्यक्षांना प्रदान केले आहेत.]

ख) कर्करोग :

=एक) [ मंडळाच्या कर्करोगग्रस्त कर्मचा-याला, मंडळाच्या सामान्य नियमांनुसार अनुज्ञेय असलेली सरासरी वेतनावरील त्याची सर्व रजा संपल्यानंतर, टाटा मेमोरिअल रुग्णालय, परळ, मुंबई xx[ किंवा कर्क-रोगावर उपचार करण्यास समर्थ आहेत अशी शासकीय रुग्णालये/शासकीय अनुदानप्राप्त रुग्णालये] यांच्या प्रमुख वैद्यकीय अधिका-याने दिलेल्या वैद्यकीय प्रमाणपत्राच्या आधारे विशेष रजा मंजूर करण्यात येईल. कर्क-रोगासाठी असलेल्या विशेष रजेचे वेतन सरासरी वेतनावरील रजे-प्रमाणेच असेल. अशाप्रकारे मंजूर करण्यात आलेली एकूण विशेष रजा एक वर्षापेक्षा अधिक असणार नाही आणि त्या कर्मचाऱ्याच्या खाती शिल्लक असलेली सरासरी वेतनावरील रजा व त्या तारखेपासून अशा रजेची गणना करण्यात येईल. ही विशेष रजा संपल्यानंतर, तो बरा होण्या-साठी त्याला आणखी रजेची आवश्यक आहे असे संबंधित सक्षम वैद्यकीय अधिका-याला वाटेल तर, देय असल्यास, अर्ध सरासरी वेतनावरील रजा त्याला मंजूर करण्यात यावी. अशाप्रकारे मंजूर करण्यात आलेली अर्ध सरासरी वेतनावरील रजा संपल्यानंतर संबंधित कर्मचा-याची नोकरी पुढे चालू राहावी याकरिता त्याच्या शारीरिक पात्रतेची तपासणी करण्या-साठी त्याला वर निर्दिष्ट केलेल्या संबंधित सक्षम वैद्यकीय अधिका-याकडे पाठवण्यात यावे आणि त्या अधिका-याने शिफारस केल्याप्रमाणे त्याला असाधारण रजा मंजूर करण्यात यावी. परंतु, या नियमान्वये मंजूर करण्यात आलेली एकूण रजा, तो कर्मचारी कर्करोगाने आजारी पडल्या-पासून ज्या तारखेला रजेवर जाईल त्या तारखेपासून तीन वर्षापेक्षा

---

x सुधारपत्र क्र. ४८, दिनांक २० सप्टेंबर १९८५ अन्वये जादा दाखल.

= सुधारपत्र क्र. ४१, दिनांक १८ ऑगस्ट १९७९ अन्वये बदली दाखल.

xx सुधारपत्र क्र. ३५, दिनांक १२ सप्टेंबर १९७७ अन्वये जादा दाखल.

अधिक होता कामा नये या अटीच्या अधीन राहून असावी. आणखी असे की, —

(क) कर्करोग झालेल्या कर्मचा-याला त्याबाबतीतील सवलत एकदा देण्यात आली असेल व त्याच्यावर उपचार केल्यावर तो कामावर रुजू होण्यास शारीरिकदृष्टया पात्र आहे असे प्रमाणित केल्यानंतर त्याला पुन्हा कर्करोगाची लागण झाली तर याबाबतीतील सवलत त्याला पुन्हा देता येईल.

(ख) कर्करोग झालेल्या कर्मचा-याला, टाटा मेमोरिअल रुग्णालय, परळ, मुंबई ×[ किंवा कर्करोगावर उपचार करण्यास समर्थ आहेत अशी शासकीय रुग्णालये/शासकीय अनुदानप्राप्त रुग्णालये ] यापैकी कोणत्याही रुग्णालयात त्याची वैद्यकीय तपासणी करून घेण्यासाठी पाठवण्यात यावे आणि तो खालील शर्तींवर कामावर रुजू होण्यापूर्वी त्याच्याबाबत शारीरिक पात्रता प्रमाणपत्र मिळवण्यात यावे. त्या शर्ती अशा —

एक) तो अर्हताप्राप्त वैद्यक व्यवसायीच्या उचित वैद्यकीय पर्यवेक्षणाखाली राहील व आपल्यावरचे उपचार चालू ठेवील;

दोन) कर्करोग झाल्याचा संशय असलेला अथवा संरोधित (अरेस्टेड) कर्करोगग्रस्त कर्मचारी, टाटा मेमोरिअल रुग्णालय, परळ, मुंबई ×[ किंवा कर्करोगावर उपचार करण्यास समर्थ आहेत अशी शासकीय रुग्णालये/शासकीय अनुदानप्राप्त रुग्णालये ] यापैकी कोणत्याही रुग्णालयात ठराविक कालांतराने आपली वैद्यकीय तपासणी करून घेईल. अशी वैद्यकीय तपासणी पुन्हा करून घेण्याचा खर्च मंडळाकडून करण्यात येईल.

(ग) कर्करोगग्रस्त कर्मचा-याला सर्वसाधारण पद्धतीने दोन वेळा विशेष रजा देण्यात यावी. अशी विशेष रजा तिस-या वेळी मंजूर करताना मात्र त्याला वरील परिच्छेद (ख) मध्ये दिलेल्यापैकी एका वैद्यकीय सक्षम अधिका-याकडून, "सदर कर्मचा-याने विनियम क्र. ५ (ख) (एक) (ख) यातील शर्तींचे पालन केले असले तरीही त्याला तिस-या वेळी कर्करोगाच्या संबंधातील सवलती देणे आवश्यक आहे" अशा अर्थाचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल. तथापि, अशी प्रकरणे आदेशार्थ मुख्य कार्यालयाकडे पाठवण्यात यावीत. ]

---

× सुधारपत्र क्र. ३०, दिनांक १२ सप्टेंबर १९८७ अन्वये जादा दाखल.

दोन) निवासस्थान ते रुग्णालय व तेथून परतीचा प्रवास करणे यासाठी कर्मचा-याला, अनुज्ञेय वर्गानुसार, प्रवासभत्ता मिळेल; परंतु, त्यावेळी येणा-या कोणत्याही आनुषंगिक खर्चापोटी त्याला कोणतीही प्रतिपूर्ती मिळणार नाही.

तीन) रुग्णालयात दाखल झाल्यानंतर कर्करोगाचा रुग्ण, खालीलप्रमाणे वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती मिळण्यास पात्र असेल :

(क) रुग्णालयाच्या अधिकारीवर्गाने दिलेली प्रमाणके सादर केल्या-वर रुग्णालय आकार;

x[(ख) xx[वेतनगट तीन व चार मधील] जो कर्मचारी कर्करोगाने आजारी असेल तो कर्मचारी, त्याने विशेष आहारावर केलेला प्रत्यक्ष आहार खर्च कमाल रु. १०० दरमहा एवढ्या मर्यादेस अधीन राहून, सहा महिनेपर्यंतच मिळण्यास पात्र असेल. परंतु, त्यासाठी त्याला खाली दिलेले प्रतिज्ञापन करून द्यावे लागेल आणि हे प्रतिज्ञापन, त्याच्यावर उपचार करणा-या शल्यचिकित्सकाने किंवा रुग्णालयाच्या सक्षम अधिका-याने योग्यरीत्या प्रतिस्वाक्षरित केलेले असले पाहिजे :

प्रतिज्ञापन

याद्वारे मी, श्री/श्रीमती/कुमारी ------------------------------ ------------------ घोषित करतो/करते की, मी डॉ. ------------------ ------------------ यांच्याकडून कर्करोगावर उपचार करून घेत होतो/होते आणि त्यांच्या सल्ल्याने ------------------------------ हा विशेष आहार घेत होतो/होते; आणि त्यासाठी मला दिनांक ---------- पासून दिनांक ---------------- पर्यंतच्या कालावधीसाठी रु.---------- ---------------- एवढा प्रत्यक्ष खर्च आला.

सही/-

( ) ]

---

x सुधारपत्र क्र. ३४, दिनांक ३० जून १९७७ अन्वये बदली दाखल.

xx सुधारपत्र क्र. ३९, दिनांक २३ ऑगस्ट १९७८ अन्वये सुधारित.

(ग) असा औषधोपचार व खर्चाची प्रतिपूर्ती प्रथमत: दोन महिन्यांसाठी अनुज्ञेय असेल व टाटा मेमोरिअल रुग्णालय, परळ, मुंबई ≠[ किंवा कर्करोगावर उपचार करण्यास समर्थ आहेत अशी शासकीय रुग्णालये/शासकीय अनुदानप्राप्त रुग्णालये ] यांच्या प्रभारी वैद्यकीय अधिकाऱ्याने दिलेल्या प्रमाणपत्राच्या आधारे, हा कालावधी ६ महिनेपर्यंत वाढवता येईल.

चार) टाटा मेमोरिअल रुग्णालयाने तसा सल्ला देऊन कर्मचाऱ्यावर बाह्य रुग्ण म्हणून उपचार केले तर, वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे तो जोपर्यंत मंडळाकडून सहाय्य मिळण्यास पात्र असेल तोपर्यंत, मुंबईतील त्याच्या वास्तव्यासाठी येणाऱ्या खर्चापोटी दरमहा रु. ५० मिळण्यास पात्र असेल.

ø[(पाच) कर्मचाऱ्याने कर्करोगावरील उपचारासाठी, येण्याजाण्याच्या प्रवास खर्चापोटी व वास्तव्यासाठी केलेला खर्च धरून, प्रत्यक्ष खर्च केलेल्या रकमेच्या ५० टक्के इतक्या रकमेची प्रतिपूर्ती सहा महिन्यांच्या कालावधीनंतरच्या कालावधीसाठी देण्याचा अधिकार ×[ वैद्यकीय सल्लागाराबरोबर विचारविनिमय केल्यानंतर सचिवास ] असेल. ]

७) <u>श्वानदंश व सर्पदंश प्रतिबंधक उपचार</u> :

<u>कामावर असताना</u> श्वानदंश किंवा सर्पदंश होणाऱ्या कर्मचाऱ्याला, विहित उपचार करून देण्याच्या कालावधीत खालील सवलती मिळतील :

एक) शासकीय रुग्णालयात फी म्हणून भरण्यात आलेल्या प्रत्यक्ष रकमेची प्रतिपूर्ती;

दोन) रुग्णालयात उपचार चालू असतील तेवढ्या दिवसांसाठी, राहण्याचे ठिकाण ते निकटचे जिल्हा रुग्णालय व तेथून परत येण्यासाठी एकेरी रेल्वेभाड्याची आणि/अथवा सामान्यत: ज्या वर्गाने प्रवास करण्यास कर्मचारी पात्र असेल त्या वर्गाने सडकेने केलेल्या प्रवासाच्या प्रत्यक्ष खर्चाची प्रतिपूर्ती;

तीन) उपचार चालू असताना २१ दिवसांपेक्षा अधिक न होणारी व कोणत्याही प्रकारच्या रजेच्या खाती हिशेबात न घेण्यात येणारी विशेष रजा;

---

≠ सुधारपत्र क्र. ३५, दि. १२ सप्टेंबर १९७७ अन्वये जादा दाखल.

ø सुधारपत्र क्र. १९, दि. ३० नोव्हेंबर १९७२ अन्वये जादा दाखल.

× सर्वसाधारण आदेश क्र. १८ (कर्मचारीवर्ग), दि. २८ मे १९६३ खालील सुधारपत्र क्र. १०१, दि. ३ मार्च १९७८ अन्वये अधिकार प्रदानात बदल.

घ) कामावर असताना इजा झाल्यास उपचार :

एक) मंडळाचा कर्मचारी कामावर असतांना त्याला इजा झाल्यास एकतर मंडळाच्या दवाखान्यात किंवा शासकीय रुग्णालयात उपचार करून घेण्याचा त्याला हक्क राहील, आणि त्याने शासकीय रुग्णालयात उपचार करून घेतल्यास त्यासाठी केलेल्या खर्चाची प्रतिपूर्ती, बिले सादर केल्यानंतर त्याला मिळू शकेल.

x दोन) श्रमिक भरपाई अधिनियमाखाली न येणारे मंडळाचे जे कर्मचारी कामावर असताना इजा झाल्यास अशासकीय रुग्णालयात उपचार करून घेतील त्यांना अशाच प्रकरणी, शासकीय रुग्णालयात उपचार घेतल्यास वरील परिच्छेद ५ (घ) (एक) मध्ये निर्दिष्ट केलेल्या रीतीने देण्यात येणारी वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती देण्याचा निर्णय घेण्याचा = अधिकार अध्यक्षांना असेल.

ø च) निर्बीजीकरण शस्त्रक्रिया करून घेण्याबद्दल विशेष नैमित्तिक रजा -

मंडळाचे जे कर्मचारी कुटुंब नियोजन योजनेखाली निर्बीजीकरण शस्त्रक्रिया [ शुक्राणुवाहिनीछेदन (व्हॅसेक्टॉमी) किंवा सॅल्पिंजेक्टॉमी)] करून घेतील त्यांना राज्य शासनाने याबाबत केलेल्या तरतुदींनुसार खालील विशेष सवलत देण्यात येईल :

एक) निर्बीजीकरण शस्त्रक्रिया [ शुक्राणुवाहिनीछेदन (व्हॅसेक्टॉमी) किंवा अंडवाहिनीछेदन (ट्युबेक्टॉमी) ] करून घेणा-या सर्व नियमित औद्योगिक व औद्योगिकेतर कर्मचा-यांना कामाच्या ६ दिवसांपेक्षा अधिक होणार नाही एवढी विशेष नैमित्तिक रजा;

दोन) गर्भधारणा प्रतिबंधक शस्त्रक्रिया करून घेणा-या स्त्री कर्मचा-यांना १४ दिवसांपेक्षा अधिक होणार नाही एवढी विशेष नैमित्तिक रजा;

तीन) लूप बसवून घेणा-या स्त्री कर्मचा-यांना १ दिवस विशेष नैमित्तिक रजा.

---

x सुधारपत्र क्र. १०, दि. २२ मे १९६९ अन्वये जादा दाखल.

= अधिकार प्रदानासाठी सुधारपत्र क्र. ४३, दि. ९ सप्टेंबर १९८० पहावे.

ø सुधारपत्र क्र. २३, दिनांक १४ जून १९७३ अन्वये सुधारित.

xx( टीप १ : मंडळाने, आपला ठराव क्र. १६५२, दि. २७ फेब्रुवारी १९७६ अन्वये, शासन निर्णय क्र. एसव्हीई-१४३८/२५६/ दि. २५ मार्च १९६८ आणि क्र. एसव्हीई-१४७३/२८२६/ एस-२, दि. १० ऑक्टोबर १९७३ अन्वये राज्य शासन आपल्या पुरुष कर्मचा-यांना दिलेल्या सवलतींच्या धर्ती खालील सवलती देण्यास मान्यता दिली :

एक) एखाद्या कर्मचा-याच्या पत्नीने (प्रसुतीखेरीज इत कोणत्याही वेळी) अंडवाहिनीछेदन शस्त्रक्रिया (टयुबेक्टॉमी ऑपरेशन) ही निर्बीजीकरण शस्त्र क्रिया करून घेतल्यास ७ दिवसांपेक्षा अधिक होणार नाही इतकी विशेष नैमित्तिक रजा;

दोन) एखाद्या कर्मचा-याच्या पत्नीने प्रसुतीनंतर लगेच अंडवाहिनी छेदन शस्त्रक्रिया (टयुबेक्टॉमी ऑपरेशन) करून घेतल्यास ४ दिवसांपेक्षा अधिक होणार नाही इतकी विशेष नैमित्तिक रजा.

प्रत्यक्षात जो डॉक्टर शस्त्रक्रिया करील त्याने दिलेले वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करण्याच्या अधीन वरी सवलती देण्यात येतील. )

टीप २ : आकस्मिक खर्चाच्या खात्यातून ज्या कर्मचा-यांना वेतन देण्यात येते त्यांना वरील सवलती देण्याचा प्रश्न मंडळाच्या विचाराधीन होता. आता त्याबाबत अस निर्णय घेण्यात आला आहे की, आकस्मिक खर्चाच्या खात्यामधून वेतन देण्यात येणारे जे कर्मचारी पूर्ण वेळ काम करावे लागते अशा सेवेत आहेत (केवळ अर्धवेळ किंव दिवसाचा काही भाग काम करावे लागते अशा सेवेत नाहीत) आणि निर्बीजीकरण शस्त्रक्रिया करून घेण्यापूर्व किंवा (स्त्री कर्मचा-यांच्या बाबतीत) लूप बसवून घेण्य पूर्वी ६ महिने सेवेत असतील आणि त्यानंतर किमान तीन महिने सेवेत राहण्याची शक्यता असेल त्यांना खालीलप्रमाणे पूर्ण वेतन देण्यात यावे.

क) ज्यांनी शुक्राणुवाहिनीछेदन (व्हॅसेक्टॉमी) शस्त्रक्र करून घेतली असेल अशा कर्मचा-यांना कामाच्या ६ दिवसांपेक्षा अधिक नसतील एवढया कालावधीचे पू वेतन;

---

xx प्रशासनिक परिपत्रक क्र. जीइएन/एमइडी/लिव्ह/१५९५०, दि. ३ एप्रिल १९७६ अन्वये समाविष्ट.

ख) ज्या स्त्री कर्मचारी गर्भधारणा प्रतिबंधक (नॉन-प्युअरपेरल) शस्त्रक्रिया करून घेतील त्यांना १४ दिवसांपेक्षा अधिक होणार नसेल एवढ्या दिवसांचे पूर्ण वेतन;

ग) ज्या स्त्री कर्मचारी लूप बसवून घेतील त्यांना १ दिवसाचे पूर्ण वेतन.

आकस्मिक खर्चाच्या खात्यातून वेतन देण्यात येणारे सर्व औद्योगिक व औद्योगिकेतर कर्मचारी या सवलतीस पात्र असतील.

वरील परिच्छेद १ मध्ये निर्दिष्ट केलेली ही विशेष नैमित्तिक रजा, मंडळाच्या कार्यव्ययी आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांनाही देण्यात यावी; मात्र यासाठी अशा कर्मचाऱ्यांची या आस्थापनेवर २४ महिने अखंड सेवा झालेली असली पाहिजे.

सामान्यत: विशेष नैमित्तिक रजेला नियमित किंवा नैमित्तिक रजा जोडून घेण्यास परवानगी नाही; परंतु शस्त्रक्रियेत पू झाल्यामुळे कर्मचाऱ्याला ६ दिवसांपेक्षा जास्त कालावधीसाठी गैरहजर राहावे लागले तर, अशा अपवादात्मक परिस्थितीत, त्याला अशाप्रकारे रजा जोडून घेण्यास परवानगी असेल.

सामान्यत: विशेष नैमित्तिक रजा मंजूर करण्यास सक्षम असलेले अधिकारी, संबंधित वस्तुस्थिती विचारात घेऊन, निर्बीजीकरण शस्त्रक्रियेसाठी विशेष नैमित्तिक रजा मंजूर करतील.

x छ) <u>हत्तीरोग</u> :

मंडळाचे हत्तीरोग झालेले कर्मचारी शासकीय रुग्णालयात त्यावर उपचार करून घेतील. यासाठी जिल्हा शल्यचिकित्सकाने कोणतीही विशिष्ट औषधे विहित केली असतील तर, त्या संबंधातील मूळ बिले त्या जिल्हा शल्यचिकित्सकाने प्रमाणित केल्यानंतर सादर केल्यावर त्या औषधांवर झालेल्या खर्चाची प्रतिपूर्ती करण्यात येईल. परंतु, इतर कोणताही खर्च मिळण्यास किंवा रजा, प्रवासभत्ता इत्यादींसारख्या शासन देत असलेल्या सवलतींशी मिळत्याजुळत्या असणाऱ्या सवलती मिळण्यास ते पात्र असणार नाहीत.

ø ज) <u>कुष्ठरोग</u> :

हा रोग क्रियाशील असेल तेव्हा -

एक) * (वगळला)

---

x सुधारपत्र क्र. ४, दि. १७ फेब्रुवारी १९६६ अन्वये जादा दाखल.

ø सुधारपत्र क्र. ५, दि. ३ ऑगस्ट १९६७ अन्वये जादा दाखल.

* सुधारपत्र क्र. ३९, दि. २३ ऑगस्ट १९७८ अन्वये सर्व वेतनगटांतील कर्मचाऱ्यांसाठी विशेष रजेची सवलत देण्यात आल्याने तेथील पूर्वीचा मजकूर वगळण्यात आला आहे.

≠[ दोन) °[- - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मंडळाच्या कुष्ठरोगग्रस्त कर्मचा-याला, मंडळाच्या सामान्य नियमां
नुसार अनुज्ञेय असलेली सरासरी वेतनावरील रजा संपल्यानंतर, सरा
वेतनावरील कुष्ठरोगासाठीची विशेष रजा देण्यात यावी आणि त
संबंधातील रजा वेतन सामान्य नियमाधारे नियमित करण्यात यावे
ही एकूण रजा १ वर्षापेक्षा अधिक असणार नाही व त्या कर्मचा-या
खाती शिल्लक असलेली सरासरी वेतनावरील रजा संपेल त्या तारखे
पासून अशा रजेची गणना करण्यात यावी. ही रजा संपल्यानंतर,
तो बरा होण्यासाठी त्याला आणखी रजेची आवश्यकता असेल तर
देय असल्यास, त्याला अर्ध सरासरी वेतनावरील रजा मंजूर करण्या
यावी: अर्ध सरासरी वेतनावरील रजा संपल्यानंतर अशा कर्मचा-य
त्याची सेवा पुढे चालू राहावी यासाठी, त्याच्या शारीरिक
पात्रतेची तपासणी करण्यासाठी वैद्यकीय मंडळाकडे पाठवण्यात यावे
आणि हे वैद्यकीय मंडळ तसा निदेश देईल तर, त्याला असाधारण र
मंजूर करण्यात यावी; मात्र या नियमान्वये अशी रजा मंजूर करत
असा कर्मचारी कुष्ठरोगग्रस्त म्हणून रजेवर गेल्यापासून तीन वर्षापेक्ष
अधिक झालेली नसली पाहिजे.

तीन) ज्या कुष्ठरोग चिकित्सालयात/खाजगी चिकित्सालयात
रोग्याची तपासणी झाली असेल त्या चिकित्सालयाकडून कर्मचा-या
निदेश दिला जाईल त्याप्रमाणे एकतर शासकीय रुग्णालयातून किंवा
निमशासकीय संघटनेकडून चालवल्या जाणा-या रुग्णालयातून किंवा
कोणत्याही रुग्णालयातून उपचार करून घेता येतील.

चार) कर्मचारी पुढीलप्रमाणे वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती मिळण्यास पा
असेल :

क) या रोगावर उपचार करणा-या किंवा ते कार्य हाती घेणा-
संबंधित संस्थेच्या प्रमुखाने योग्य प्रकारे प्रतिस्वाक्षरीत केलेली
प्रमाणके सादर केल्यानंतर तपासणीच्या संबंधातील खर्चाची पूर्ण
प्रतिपूर्ती;

ख) डॉक्टरने विहित केलेली औषधे व शक्तिवर्धके यांवरील पूर्ण
खर्चाची प्रतिपूर्ती; ]

x[ग) ø"वेतनगट तीन व चार मधील जो कर्मचारी कुष्ठरोगाने आजा
असेल तो कर्मचारी, त्याने विशेष आहारावर केलेला प्रत्यक्ष
आहार खर्च, कमाल रु. १०० दरमहा एवढ्या मर्यादेस अधीन

---

≠ सुधारपत्र क्र. ३, दि. १५ ऑक्टोबर १९६५ अन्वये जादा दाखल.
o सुधारपत्र क्र. ३९, दि. २३ ऑगस्ट १९७८ अनुसार कंसातील मजकूर वगळण्यात आला.
x सुधारपत्र क्र. ३४, दि. ३० जून १९७७ अन्वये बदली दाखल.
ø सुधारपत्र क्र. ३९, दि. २३ ऑगस्ट १९७८ अन्वये सुधारित.

राहून, सहा महिनेपर्यंतच मिळण्यास पात्र असेल. परंतु, त्यासाठी त्याला खाली दिलेले प्रतिज्ञापन करून द्यावे लागेल आणि हे प्रतिज्ञापन, त्याच्यावर उपचार करणा-या शल्यचिकित्सकाने किंवा रुग्णालयाच्या सक्षम अधिका-याने योग्य रीत्या प्रतिस्वाक्षरीत केलेले असले पाहिजे :

प्रतिज्ञापन

याद्वारे मी, श्री/श्रीमती/कुमारी ---------------------------------------------- घोषित करतो/करते की, मी डॉ. ------------------ यांच्याकडून कुष्ठरोगावर उपचार करून घेत होतो/होते आणि त्यांच्या सल्ल्याने ------------------ हा विशेष आहार घेत होतो/होते; आणि त्यासाठी मला दिनांक ---------- पासून दिनांक ------------ पर्यंतच्या कालावधीसाठी रु. ------------ एवढा प्रत्यक्ष खर्च आला.

सही/-

( ) ]

घ) रुग्णालयाला प्रदान केलेल्या खर्चाची प्रतिपूर्ती;

च) प्रतिपूर्ती ३ वर्षापेक्षा अधिक कालावधीकरिता अनुज्ञेय असणार नाही आणि त्यापुढील कालावधीत केलेल्या उपचारापोटी झालेल्या खर्चाची कोणतीही प्रतिपूर्ती दिली जाणार नाही.

छ) निवासस्थान ते रुग्णालय व तेथून परतीचा प्रवास करणे यासाठी कर्मचा-याला, अनुज्ञेय वर्गानुसार प्रवासभत्ता मिळेल; परंतु, त्यावेळी येणा-या कोणत्याही आनुषंगिक खर्चापोटी त्याला कोणतीही प्रतिपूर्ती मिळणार नाही.

ज) नियत सेवावधीचे वय पूर्ण झाल्यानंतर कर्मचा-याला या योजनेखाली उपलब्ध असणा-या कोणत्याही सवलती मिळणे बंद होईल.

≠[ झ) एक) एखादा कर्मचा-याला किंवा त्याच्या °[ कुटुंबातील त्याच्यावर पूर्णपणे अवलंबून असलेल्या) व्यक्तीला ] गंभीर

---

≠ सुधारपत्र क्र. १८, दि. ९ ऑक्टोबर १९७० अन्वये जादा दाखल.

० सुधारपत्र क्र. ५२, दि. २९ डिसेंबर १९८० अन्वये बदली दाखल.

आजारामुळे कोणत्याही ठिकाणहून शासकीय किंवा नगरपालि[illegible] किंवा जिल्हा परिषद रुग्णालयात हलवण्यासाठी मंडळाच्या वाहनाचा मोफत वापर करता येईल; मात्र यासाठी प्रकरणपर[illegible] नोंदणीकृत वैद्यकीय अधिका-याने किंवा विद्युत केंद्राच्या रुग्णा-लयाच्या/दवाखान्याच्या प्रभारी वैद्यकीय अधिका-याने पुढील-प्रमाणे प्रमाणपत्र दिले पाहिजे. :

"श्री/श्रीमती/कुमारी ——————————————
यांच्यावर स्थानिकरीत्या उपचार करणे शक्य नसल्[illegible]
त्यांना रुग्णालयात हलवणे आवश्यक आहे".

दोन) एखादा कर्मचा-याचा किंवा ×[ त्याच्यावर पूर्णपणे अवलंबून असले[illegible] कुटुंबातील व्यक्तीचा ] मृतदेह रुग्णालयातून त्याच्या निवासस्था[illegible] कामाच्या ठिकाणी आणण्यासाठी त्याचप्रमाणे तशीच गरज पडल्यास आजारातून पूर्णत: बरा न झालेल्या/दुखण्यातून उठलेल[illegible] कर्मचा-याला किंवा ×[ त्याच्यावर पूर्णपणे अवलंबून असलेल्या कुटुं[illegible]तील व्यक्तीला] रुग्णालयातून त्याच्या निवासस्थानी/कामाच्[illegible] ठिकाणी आणण्यासाठी मंडळाच्या वाहनाचा मोफत वापर करत[illegible] येईल. ]

६. प्रतिपूर्तीसाठी बिले सादर करताना ती जोडपत्र "घ" मध्ये दिलेल्या नमुन्यात, ज्या विद्युत केंद्रामध्ये कर्मचारी काम करीत असेल त्या विद्युत केंद्रामधील वेतनगट दोनमधील अधिका-याच्या खालच्या दर्जाचा नसेल अशा उप विभागीय अधिका-याकडे/त्यापेक्षा वरच्या अधिका-याकडे, प्रकरणपरत्वे, तो आजारातून बरा झाल्यापासून किंवा रजेवरून परत आल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत, सादर करण्यात यावीत. त्यानंतर आलेल्या बिलांची प्रतिपूर्ती, लगत वरच्या अधिका-यांच्या पूर्वपरवानगीशिवाय, करण्यात येणार नाही. अशा बिलांची उचितरीत्या छाननी करण्यात आल्यानंतर वर निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही अधि-का-याकडून त्यांची रक्कम देय असेल. रक्कम देण्याचा आदेश देण्यास तो सक्षम असेल. मात्र, क्षयरोगाशी/कर्करोगाशी संबंधित असलेल्या बिलांबाबत मुख्य कार्यालय कार्यवाही करील आणि अशा बिलांना वैद्यकीय सल्लागाराशी विचारविनिमय करून केवळ सचिव मंजुरी देऊ शकेल.

७. <u>संकीर्ण</u> :

या सर्वसाधारण आदेशामुळे यापूर्वी वेळोवेळी प्रसृत झालेले सर्व सर्वसाधारण स्थायी आदेश, परिपत्रके, इत्यादी, रद्द झाल्याचे समजण्यात यावे.

---

× सुधारपत्र क्र. ५२, दि. २९ डिसेंबर १९८६ अन्वये बदली दाखल.

आजारामुळे कोणत्याही ठिकाणाहून शासकीय किंवा नगरपालिक किंवा जिल्हा परिषद रुग्णालयात हलवण्यासाठी मंडळाच्या वाहनाचा मोफत वापर करता येईल; मात्र यासाठी प्रकरणप नोंदणीकृत वैद्यकीय अधिका-याने किंवा विद्युत केंद्राच्या रुग्णा-लयाच्या/दवाखान्याच्या प्रभारी वैद्यकीय अधिका-याने पुढील-प्रमाणे प्रमाणपत्र दिले पाहिजे. :

"श्री/श्रीमती/कुमारी ______________________ यांच्यावर स्थानिकरीत्या उपचार करणे शक्य नसल्य त्यांना रुग्णालयात हलवणे आवश्यक आहे".

दोन) एखादा कर्मचा-याचा किंवा ×[ त्याच्यावर पूर्णपणे अवलंबून अस कुटुंबातील व्यक्तीचा ] मृतदेह रुग्णालयातून त्याच्या निवासस्थ कामाच्या ठिकाणी आणण्यासाठी त्याप्रमाणे तशीच गरज पडल्यास आजारातून पूर्णत: ब-या न झालेल्या/दुखण्यातून उठले कर्मचा-याला किंवा ×[ त्याच्यावर पूर्णपणे अवलंबून असलेल्या कु तील व्यक्तीला ] रुग्णालयातून त्याच्या निवासस्थानी/कामाच्य ठिकाणी आणण्यासाठी मंडळाच्या वाहनाचा मोफत वापर करत येईल. ]

६. प्रतिपूर्तीसाठी बिले सादर करताना ती जोडपत्र "घ" मध्ये दिलेल्या नमुन्यात, ज्या विद्युत केंद्रामध्ये कर्मचारी काम करीत असेल त्या विद्युत केंद्रामधील वेतनगट दोनमधील अधिका-याच्या खालच्या दर्जाचा नसेल अशा उप विभागीय अधिका-याकडे/त्यापेक्षा वरच्या अधिका-याकडे, प्रकरणपरत्वे, तो आजारातून बर झाल्यापासून किंवा रजेवरून परत आल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत, सादर करण्यात यावीत. त्यानंतर आलेल्या बिलांची प्रतिपूर्ती, लगत वरच्या अधिका-यांच्या पूर्वपरवानगीशिवाय, करण्यात येणार नाही. अशा बिलांची उचितरीत्या छाननी करण्यात आल्यानंतर वर निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही अधि का-याकडून त्यांची रक्कम देय असेल. रक्कम देण्याचा आदेश देण्यास तो सक्षम असेल. मात्र, क्षयरोगाशी/कर्करोगाशी संबंधित असलेल्या बिलांबाबत मुख्य कार्याल कार्यवाही करील आणि अशा बिलांना वैद्यकीय सल्लागाराशी विचारविनिमय करून केवळ सचिव मंजुरी देऊ शकेल.

७. संकीर्ण :

या सर्वसाधारण आदेशामुळे यापूर्वी वेळोवेळी प्रसृत झालेले सर्व सर्वसाधारण स्थायी आदेश, परिपत्रके, इत्यादी, रद्द झाल्याचे समजण्यात यावे.

---

× सुधारपत्र क्र. ५२, दि. २९ डिसेंबर १९८६ अन्वये बदली दाखल.

## परिशिष्ट – क

## प रि च य प त्र

( तपासणी करणा–या डॉक्टरला देण्यासाठी )

---------------------------

---------------------------

---------------------------

यांजकडून

---------------------------

---------------------------

---------------------------

यांस,

विषय : मंडळातील सेवेसाठी शारीरिक पात्रते–
संबंधातील वैद्यकीय तपासणी.

महोदय,

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या सेवेतील उमेदवारांच्या शारीरिक पात्रते–संबंधातील वैद्यकीय तपासणीचे काम महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ आपणाकडे सोपवीत असून वेतनगट एक व दोन मधील उमेदवारांकडून प्रत्येकी रु. x[ २०/– ] व वेतनगट तीन व चार मधील उमेदवारांकडून प्रत्येकी रु. x[ १०/– ] इतकी वैद्यकीय तपासणी फी मिळण्यास आपण पात्र असाल.

त्यानुसार, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने ------------------------ या पदावर नियुक्ती करण्यासाठी निवड केलेले/केलेल्या हे परिचय पत्र धारण करणारे/करणा–या श्री/श्रीमती/कुमारी ------------------------ यांची वैद्यकीय तपासणी आपण करावी व त्यांचे आरोग्य, वय व त्याचप्रमाणे मंडळातील सेवेसाठी शारीरिक पात्रता आहे किंवा नाही या संबंधातील आपला अभिप्राय मला पाठवण्यात यावा, ही विनंती.

उमेदवाराची माहिती खाली दिली आहे :

---

x सुधारपत्र क्र. २१, दि. २३ फेब्रुवारी १९७३ अन्वये दरांमध्ये सुधारणा.

१. नाव :

२. वय :

३. उंची. :

४. बांधा :

५. ओळख चिन्हे :

१. ------------------

२. ------------------

६. ज्या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे किंवा करण्याचा प्रस्ताव आहे ते पद :

७. ज्या वेतनगटात नियुक्ती करण्यात आली आहे किंवा करण्याचा प्रस्ताव आहे तो वेतनगट -- : एक/दोन/तीन/चार

उमेदवाराने माझ्या समक्ष असे प्रतिज्ञापन करून दिले आहे की, योग्य प्रकारे घटित करण्यात आलेल्या कोणत्याही वैद्यकीय प्राधिकरणाने शासकीय सेवेसाठी किंवा सांविधिक मंडळातील सेवेसाठी त्याला यापूर्वी शारीरिकदृष्टया अपात्र ठरवलेले नाही.

त्याने आपल्या x[ छातीचा क्ष-किरण अहवाल ] आणणे आवश्यक आहे.

यासंबंधातील आपला अहवाल शक्य तितक्या लवकर पाठवण्यात यावा ही विनंती.

आपला,

---

x सुधारपत्र क्र. ३४, दि. ३० जून १९७७ अन्वये सुधारणा.

## परिशिष्ट – ७

### शारीरिक पात्रता प्रमाणपत्राचा नमुना

डॉक्टरचे नाव :

दिनांक :

मी याद्वारे प्रमाणित करतो की, मी आज दिनांक ---------- रोजी श्री/श्रीमती/कुमारी ----------------------------, -------------- (पदनाम) महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या सेवेतील/सेवेत घेण्यात येणा–या उमेदवाराची शारीरिक तपासणी केली आणि त्याला/तिला -------------------- याचा अपवाद करता, संक्रामित किंवा अन्य प्रकारचा कोणताही रोग झाल्याचे आढळून आले नाही आणि/किंवा कोणतीही उपगत शारीरिक विकलता असल्याचे आढळून आले नाही.

वरील अपवाद हा, ---------------------- या कार्यालयातील सेवा–प्रवेशासाठी शारीरिक अपात्रता मानता येणार नाही.

उमेदवाराने केलेल्या निवेदनावरून त्याचे वय ---------- वर्षे असून त्याच्या दिसण्यावरून त्याचे वय सुमारे ----------- वर्षे असावे. उमेदवाराने लस टोचून घेतलेली आहे तसेच त्याने छातीचे क्ष–किरण छायाचित्र काढून घेतले आहे.

ओळख चिन्हे : १.

२.

डॉक्टरची सही
व अर्हता

कर्मचा–याच्या डाव्या
हाताच्या अंगठ्याची
निशाणी.

## प्रतिज्ञापन

माझे नाव श्री/श्रीमती/कुमारी ------------------------------------ असून महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळात माझी -------------------- म्हणून (पदनाम) नियुक्ती झालेली आहे/नियुक्ती करण्याचा प्रस्ताव आहे. याद्वारे मी असे प्रतिज्ञापन करून देत आहे की, योग्य प्रकारे घटित करण्यात आलेल्या कोणत्याही वैद्यकीय प्राधिकरणाने शासकीय किंवा कोणत्याही सांविधिक मंडळातील सेवेसाठी मला यापूर्वी शारीरिकदृष्टया अपात्र ठरवलेले नाही.

सही --------------------

( )

दिनांक :

साक्षांकित :

सहायक कर्मचारीवर्ग अधिकारी/प्रशासन अधिकारी
महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ.

----------

## परिशिष्ट "ग"

( वै. यो. विनियम क्र. ४ (तीन), पहावा )

मंडळाच्या सेवेत अर्धवेळ डॉक्टरची नियुक्ती करण्याबाबतच्या अटी व शर्ती.

१. एखाद्या विशिष्ट प्रकरणी मंडळ निश्चित करील तेवढ्या कालावधीसाठी अर्ध-वेळ डॉक्टरची नियुक्ती असेल.

२. त्या त्या प्रकरणी ठरवण्यात येईल त्याप्रमाणे अर्धवेळ डॉक्टर दवाखान्यात उपस्थित राहील.

३. असा डॉक्टर (प्रत्येक प्रकरणी ठरवण्यात येईल त्याप्रमाणे) विनाभत्ता एकत्रित वेतन मिळण्यास पात्र असेल.

४. तो, (क) साप्ताहिक सुटी, (ख) प्रत्येक प्रकरणी मंडळाचे अध्यक्ष ठरवतील त्याप्रमाणे सार्वजनिक सुट्या, (ग) दहा दिवस नैमित्तिक रजा आणि (घ) वर्षाला पंधरा दिवस अर्जित रजा मिळण्यास पात्र असेल. इतर कोणत्याही प्रकारची वेतनी रजा मिळण्यास तो पात्र असणार नाही.

५. मंडळाचे वर्तणूक, शिस्त व अपील विनियम त्याला लागू असतील. परंतु, मंडळातील अर्धवेळ डॉक्टरने काम करण्यात अडचण निर्माण होणार नाही अशा रीतीने त्याला खाजगी व्यवसाय करता येईल किंवा अन्य कोणतेही काम तो स्वीकारू शकेल.

६. सेवा निवृत्तीसंबंधातील कोणतेही लाभ मिळण्यास तो पात्र असणार नाही.

७. अध्यक्ष, त्याचे पद ज्या कोणत्या वेतनगटातील पदाशी तुल्य म्हणून घोषित करतील त्या पदावरील कर्मचा-याला अनुज्ञेय असलेला प्रवासभत्ता मिळण्यास तो पात्र असल.

८. कामावर असताना एखाद्या कर्मचा-याला अपघात होईल तेव्हाच केवळ त्याला त्याच्या ठरलेल्या वेळेव्यतिरिक्त कोणत्याही वेळी बोलावण्यात येईल

---

## परिशिष्ट - "ड"

(नेबलाचा नमुना)

(वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ति योजनेचा विनियम क्र. ७)

एक. १. (क) कर्मचा-याचे संपूर्ण नाव :

(ख) पदनाम :

(ग) अंशदायी भविष्यनिर्वाह निधि क्र. :

२. संस्थाच्या सेवेत रुजू झाल्याची तारीख :

३. आस्थापनेवरील पद- नियमित/अस्थायी :

४. विभागाचे/कक्षाचे/शाखेचे नाव :

५. (क) वैद्यकीय उपचार करण्यात आलेल्या व्यक्तीचे नाव व तिचे कर्मचा-याशी नाते :
(स.आ.क्र.२० (कर्मचारीवर्ग) याचे सुधारपत्र क्र. ५२, दि.२९ डिसेंबर १९८६ मध्ये दिलेल्या "कुटुंब" या संज्ञेची व्याख्या पहा)

| | नाव | नाते |
|---|---|---|
| १) | स्वत: | |
| २) | | |
| ३) | | |
| ४) | | |

प्रमाणित करतो/करते की, उपरिनिर्दिष्ट व्यक्ती माझ्यावर पूर्णपणे अवलंबून आहे/आहेत.
(आवश्यक असल्यास प्रमाणित करा.)

(ख) आजारपणाचा कालावधी : दि. ते दि.

६. वैद्यकीय उपचार करणा-या नोंदणी-कृत वैद्यकीय व्यवसायीची माहिती :
(क) नाव :
(ख) पत्ता :

(ग) नोंदणी क्र. :

७. कर्मचा-याचा सध्याचा पत्ता :

८. खर्चाचा तपशील :

| अनुक्रमांक | पावतीचा/रोखीच्या पावतीचा तपशील | रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| | | रु. पैसे | |

प्रमाणित करतो/करते की वर दिलेली सर्व माहिती खरी आहे.

कर्मचारी-याची सही

---

दोन. **शाखा/कक्ष/विभाग प्रमुखांच्या वापरासाठी**

सदर कर्मचारी माझ्या नियंत्रणाखाली काम करीत असून त्याने केलेली वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीची मागणी आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पुढे पाठवण्यात येत आहे.

शाखा/कक्ष/विभागप्रमुख

स.क.अ. (सर्वसाधारण कार्य शाखा) (मुख्यालय)
शाखा/कक्ष/विभाग प्रमुख (क्षेत्र)

---

तीन. **सर्वसाधारण कार्य शाखा (मुख्यालय) / संबंधित शाखा/कक्ष/विभाग (क्षेत्र) यांच्या वापरासाठी**

सर्वसाधारण आदेश क्र. २० (कर्मचारीवर्ग), दि. १७ जून १९६३ मधील तरतुदींनुसार वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीची मागणी विचारात घेऊन तिची छाननी करण्यात आली. या मागणीच्या प्रतिपूर्तीचा तपशील खालीलप्रमाणे :

१) मागणी क्र. ---------------- कौंटर पर्ण ----------------

२) मागणीची रक्कम रु. ----------------

३) प्रतिपूर्तीसाठी उपलब्ध असलेली शिल्लक रक्कम रु. ----------------

४) अनुज्ञेय रक्कम रु. ----------------

५) शिल्लक रक्कम रु. ----------------

स.क.अ. (सर्वसाधारण कार्य शाखा) (मुख्यालय)
शाखा/कक्ष/विभाग प्रमुख (क्षेत्र)

वैद्यकीय सल्लागार (केवळ मुख्यालयाकरिता)

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ.

दिनांक : १६ जानेवारी, १९७८

## सुधारपत्र क्र. ३६

(स.आ. क्र. २० (कर्मचारीवर्ग), दि. १७ जून १९६३ करीता)

१. मंडळाने, आपला ठराव क्र. ८५०, दिनांक १२ जानेवारी १९७८ अन्वये, सर्वसाधारण आदेश क्र. ८३, दि. ६ जुलै १९७७ लागू होणा-या कर्मचा-यांच्या वैद्यकीय खर्च प्रतिपूर्तीच्या वार्षिक मर्यादेत दिनांक १ एप्रिल १९७८ पासून पुढीलप्रमाणे वाढ करण्यास मान्यता दिली आहे :

क) मंडळाचे स्वत:चे दवाखाने असलेल्या विद्युत केंद्रांत काम करणारे कर्मचारी व ज्यांना राज्य कर्मचारी विमा अधिनियम/योजना लागू आहे असे कर्मचारी वगळता, मुंबई, पुणे आणि नागपूर येथे काम करणा-या कर्मचा-यांना तसेच त्या शहरांमध्ये अनुज्ञेय असलेल्या दराने घरभाडे भत्ता व स्थानिक पूरक भत्ता मिळण्यास मंडळाने पात्र ठरवलेल्या इतर ठिकाणच्या कर्मचा-यांना वार्षिक रु. २५०/- (रु. १२५/- या विद्यमान दराऐवजी);

ख) मंडळाचे स्वत:चे दवाखाने असलेल्या विद्युत केंद्रांत काम करणारे कर्मचारी व ज्यांना राज्य कर्मचारी विमा अधिनियम/योजना लागू आहे असे कर्मचारी वगळता इतर ठिकाणी काम करणा-या कर्मचा-यांना वार्षिक रु. २०४/- (रु. १००/- या विद्यमान दराऐवजी).

२. सर्वसाधारण आदेश क्र. ८० (कर्मचारीवर्ग), दिनांक १९ जानेवारी १९७७ लागू होणा-या कर्मचा-यांपैकी मुंबई, पुणे व नागपूर येथे काम करणा-या कर्मचा-यांना वार्षिक रु. १२५/- व इतर ठिकाणी (जेथे मंडळाचे स्वत:चे दवाखाने आहेत अशा विद्युत केंद्रांत काम करणारे व जेथे राज्य कामगार विमा अधिनियम/योजना लागू आहे तेथील कर्मचारी वगळता) काम करणा-या कर्मचा-यांच्या बाबतीत वार्षिक रु. १००/- या विद्यमान दराऐवजी दिनांक १ जानेवारी १९७८ पासून खाली दर्शविल्याप्रमाणे सुधारणा करण्याचे मंडळाने ठरविले आहे :

क) मुंबई, पुणे व नागपूर येथे काम करणा-या कर्मचा-यांना, तसेच त्या शहरांमध्ये अनुज्ञेय असलेल्या दराने घरभाडे भत्ता व स्थानिक पूरक भत्ता मिळण्यास मंडळाने पात्र ठरवलेल्या इतर ठिकाणच्या कर्मचा-यांना, आणि/किंवा त्या शहरांना संलग्न म्हणून घोषित केलेल्या ठिकाणच्या कर्मचा-यांना रु. २०/- या दराने मासिक वैद्यकीय भत्ता दिला जाईल.

ख) इतर ठिकाणी काम करणा-या कर्मचा-यांना रु. १७/- या दराने मासिक वैद्यकीय भत्ता दिला जाईल.

३. रुपये ४१०-३५-५८५-रोध-४०-९८५ या वेतनश्रेणीतील कर्मचा-यांना नियम मासिक वैद्यकीय भत्त्याऐवजी वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती देण्याचा विकल्प देता येईल. अशा प्रतिपूर्तीची वार्षिक रक्कम, सध्या अस्तित्वात असलेल्या वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ति नियमाप्रमाणे देय होणा-या १२ महिन्यांच्या वैद्यकीय भत्त्याइतकी मर्यादित असेल.

४. दिनांक १ जानेवारी १९७८ रोजी किंवा त्यानंतर एक वर्ष सेवा पूर्ण होणा-या कार्यव्ययी आस्थापनेवरील व्यक्तींना उपर्युक्त दरांप्रमाणे मासिक वैद्यकीय भत्ता दिला जाईल.

५. नाममात्र हजेरीपटावरील नियुक्तीनंतर दिनांक १ जानेवारी १९७८ रोजी किंवा त्यानंतर एक वर्ष सेवा पूर्ण होणा-या कर्मचा-यांना त्यांचे प्रत्यक्ष कामाचे दिवस पगारी साप्ताहिक सुट्टी व पगारी सुट्टी या दिवसांसाठी प्रतिदिन ५० पैसे या दराने वैद्यकीय भत्ता दिला जाईल. वैद्यकीय भत्त्याची रक्कम स्वतंत्र दर्शवून ती कर्मचा-याच्या एकत्रित वेतनात समाविष्ट केली जाईल.

६. दिनांक १ जानेवारी १९७८ पासून जुनी योजना अस्तित्वात राहणार नसल्यामुळे, फक्त दिनांक ३१ डिसेंबर १९७७ पर्यंतच्या आजारपणाबाबतच्या मागण्यांची जुन्या योजनेप्रमाणे प्रतिपूर्ती करण्यास परवानगी दिली जाईल आणि अशा प्रकरणी दिनांक ३१ जानेवारी १९७८ पर्यंत मागण्या सादर केल्या जाव्यात. मात्र, जुन्या योजनेप्रमाणे प्रतिपूर्तीची जेवढी रक्कम मागणी न केल्यामुळे शिल्लक राहिली असेल तेवढयापुरत्याच अशा मागण्या मर्यादित असतील.

७. या सुधारपत्रामुळे स. आ. क्र. २०, दिनांक १७ जून १९६३ मधील परिच्छेद क्र. ४ (एक) हा वरीलप्रमाणे सुधारला असे समजावे. स. आ. क्र. २० (कर्मचारी-वर्ग), दिनांक १७ जून १९६३ मधील वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या संदर्भातील इतर अटी व तरतुदी अबाधित राहतील.

सही/-
सचिव

---------

क्र. पीएडी/मेडीकल/३६८४३
महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ,

दिनांक : १७ ऑगस्ट, १९७८

सुधारपत्र क्र. ३८

(स.आ.क्र. २०, दि. १७ जून १९६३ करिता)

मंडळाने आपला ठराव क्र. ११५९, दिनांक २९ जुलै १९७८ अन्वये मंजुरी दिली आहे की, सुधारपत्र क्र. ३६, दिनांक १६ जानेवारी १९७८ (सर्वसाधारण आदेश क्र. २०, दिनांक १७ जून १९६३ करिता) अनुसार वैद्यकीय भत्ता मिळण्यास पात्र ठरण्यास आवश्यक असणाऱ्या एक वर्ष सेवेची गणना करण्याच्या प्रयोजनास्तव, नाममात्र हजेरी पटावरील किंवा कार्यव्ययी किंवा अस्थायी आस्थापनेवरील अखंडीत असणारी सर्व सेवा, हिशेबात घेतली जावी. त्यानुसार, नाममात्र हजेरीपटावरील किंवा कार्यव्ययी आस्थापनेवरील कर्मचारी एक वर्षाच्या सेवेनंतर स्थायी किंवा अस्थायी तत्त्वावर नियमित आस्थापनेवर सामावून घेतला गेल्यावर, त्या तारखेपासून तो नियमित आस्थापनेवरील कर्मचाऱ्याला मिळणारे वैद्यकीय लाभ मिळण्यास पात्र ठरेल, आणि एक वर्ष संपण्यापूर्वीच त्याला अशा प्रकारे सामावून घेतले गेल्यास, त्याची नाममात्र हजेरी पटावरील/कार्यव्ययी आस्थापनेवरील सेवा धरून एकूण सेवा एक वर्ष पूर्ण होण्याच्या तारखेपासून तो असे लाभ मिळण्यास पात्र ठरेल.

सही/-
सचिव

------------

क्र. पीएडी/जीईएन/मेडीकल/
महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ,

दिनांक : २३ ऑगस्ट, १९७८

सुधारपत्र क्र. ३९

(स.आ.क्र. २०, दि. १७ जून १९६३ करिता)

मंडळाने आपला ठराव क्र. १२१०, दिनांक १० ऑगस्ट १९७८ अन्वये निर्णय घेतला आहे की, प्रतिपूर्ती व विशेष रजा या सवलती मंडळातील वेतनगट तीन व चार मधील सर्व कर्मचाऱ्यांना, मग त्यांचे मूळ वेतन कितीही असो, दिनांक १ एप्रिल १९७८ पासून दिल्या जाव्यात.

मंडळाने आणखी असाही निर्णय घेतला आहे की, क्षयरोग/कुष्ठरोग/कर्करोग यावरील उपचारांसाठी वेतनगट तीन व चार मधील कर्मचाऱ्यांना सर्वसाधारण आदेश क्र. २० अनुसार मिळणारी विशेष रजेची सवलत वेतनगट एक व दोन मधील अधिकाऱ्यांना देखील दिली जावी.

सही/-
सचिव

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ

दिनांक : ३० जुलै, १९७९

सुधारपत्र क्र. ४०

(स.आ.क्र. २०, दि. १७ जून १९६३ करिता )

मंडळाने आपला ठराव क्र. १८२१, दिनांक २८ जून १९७९ अन्वये मंजुरी दिली आहे की, सुधारपत्र क्र. १३, दिनांक ९ जुलै १९७० अन्वये अधिसूचित करण्यात आलेल्या, मोठया शस्त्रक्रिया कराव्या लागणा-या रोगांच्या यादीमध्ये, "मानवी हृदयातील झडप बदलण्याच्या शस्त्रक्रियेचा" समावेश करण्यात यावा आणि अशी झडप खरेदी करण्यात आल्यास तिची प्रत्यक्ष किंमत व प्रत्यक्ष खर्च केलेल्या इतर वैद्यकीय खर्चाच्या ५० टक्के एवढया रकमेची प्रतिपूर्ती संबंधित कर्मचा-याला देण्यात यावी.

सही/-
सचिव

------------

क्र. जीएडी/इन्स्पे/
महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ,

दिनांक : १० जानेवारी, १९८०

सुधारपत्र क्र. ७२

(स.आ.क्र. २०, दिनांक १७ जून १९६३ करिता)

मंडळाने आपला ठराव क्र. २०९, दिनांक १५ नोव्हेंबर १९७९ अन्वये, विद्युत केंद्रांतील ×वरिष्ठ कार्यकारी अभियंता (निर्मिती) यांना वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीबाबत पुढीलप्रमाणे अधिकार प्रदान करण्यास मंजुरी दिली आहे :

| | | |
|---|---|---|
| क) | कर्मचारी व त्याच्यावर अवलंबून असलेले त्याचे कुटुंबीय यांनी अपघात प्रकरणी किंवा मोठ्या आजारावर शासकीय रुग्णालयात करून घेतलेल्या उपचारासाठी किंवा शस्त्रक्रियेसाठी झालेल्या वैद्यकीय खर्चाची, शासकीय कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या मर्यादेपर्यंत प्रतिपूर्ती. | अधीक्षक अभियंता/×(अधीक्षक अभियंता (निर्मिती)/वरिष्ठ कार्यकारी अभियंता (निर्मिती)) ---- रु. ५००/- |
| ख) | श्रमिक भरपाई अधिनियम लागू नसणाऱ्या कर्मचाऱ्याने, तो कामावर असताना झालेल्या इजेवर बिगर शासकीय रुग्णालयात करून घेतलेल्या उपचाराच्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती. | अधीक्षक अभियंता/×(अधीक्षक अभियंता (निर्मिती)/वरिष्ठ कार्यकारी अभियंता (निर्मिती)) ---- रु. ५००/- |

सही/-
सदस्य(प्रशासन)/सचिव

---

× सर्वसाधारण आदेश क्र. १७ (कर्मचारीवर्ग), दिनांक ११ एप्रिल १९६३ यासाठी काढण्यात आलेल्या सुधारपत्र क्र. ३७, दि. २४ फेब्रुवारी १९८८ अन्वये, "वरिष्ठ विद्युत केंद्र अधीक्षक" व "विद्युत केंद्र अधीक्षक" या पदनामांऐवजी अनुक्रमे वरील नवीन पदनामे देण्यात आली.

क्र. जीएडी/इन्स्पेक्शन/
महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ

दिनांक : ९ सप्टेंबर, १९८०

सुधारपत्र क्र. ४३

(स.आ.क्र. २०, दिनांक १७ जून १९६३ करिता)

(स.आ.क्र.१८ (कर्मचारीवर्ग) चे सुधारपत्र क्र.१७१, दि.३ मार्च १९७६ यासह)

मंडळाने आपला ठराव क्र. ६४२, दिनांक १९ जुलै १९८० अन्वये, खाली नमूद केलेल्या बाबींबाबत सध्या प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचे पुनर्विलोकन केले व त्या बाबींसमोर निर्दिष्ट केलेल्या अधिका-यांना अधिकार प्रदान करण्याचा निर्णय घेतला.

| स.आ.क्र.२०, दि. १७ जून १९६३ मधील परिच्छेद क्रमांक | बाब | सक्षम अधिकारी |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| ५ (घ) (१) | कर्मचारी व त्याच्यावर अवलंबून असलेले त्याचे कुटुंबीय यांनी अपघात प्रकरणी किंवा मोठ्या आजारासाठी शासकीय रुग्णालयात करून घेतलेल्या उपचारावर केलेल्या किंवा शस्त्रक्रियेसाठी झालेल्या वैद्यकीय खर्चाची, शासकीय कर्मचा-यांना मिळणा-या मर्यादेपर्यंत, प्रतिपूर्ती. | संबंधित तांत्रिक संचालक/तांत्रिक सदस्य/लेखा सदस्य/सदस्य (प्रशासन)---------- रु. १०००/- पेक्षा अधिक |
| ५ (घ) (२) | श्रमिक भरपाई अधिनियम लागू नसणा-या कर्मचा-याने, तो कामावर असताना झालेल्या इजेवर बिगर शासकीय रुग्णालयात करून घेतलेल्या उपचारांच्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती. | वरीलप्रमाणे |
| सुधारपत्र क्र. ३१, दि. २३ मार्च १९७६ | मंडळाने तयार केलेल्या नियमांच्या कक्षेत चपखल न बसणा-या प्रकरणी निर्णय घेऊन वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीस मंजुरी देणे. | लेखा सदस्य, ------ सदस्य(प्रशासन) व वैद्यकीय सल्लागार यांच्याशी विचार-विनिमय करून. |

सही/-
सदस्य(प्रशासन)/सचिव

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ

दिनांक : ६ डिसेंबर, १९८०

सुधारपत्र क्र. ४४

(स.आ.क्र. २० (कर्मचारीवर्ग), दि. १७ जून १९६८ करिता)

मंडळाने, आपला ठराव क्र. ८०२, दिनांक २९ ऑक्टोबर १९८० अन्वये, कर्मचा-याला स्वतःला, स.आ.क्र. २०, दिनांक १७ जून १९६८ व तदन्वये प्रसृत करण्यात आलेल्या सुधारपत्रांद्वारे अधिसूचित केलेले गंभीर आजार व शस्त्रक्रिया करावे लागणारे आजार यामुळे कर्मचा-याला एखाद्या खाजगी रुग्णालयात ठेवले असेल व तेथे त्याने जो एकूण वैद्यकीय खर्च केला असेल त्यांतील, खालील बाबींवर केलेल्या वैद्यकीय खर्चाच्या २५ टक्के रकमेची त्यास प्रतिपूर्ती करण्यास मंजुरी दिली :

१) खाटेचा खर्च (बेड चार्जेस)

२) भोजनखर्च

३) शस्त्रक्रियेवरील खर्च

४) क्ष-किरण तपासणीचा खर्च

५) औषधांचा खर्च

६) रक्तासाठी झालेला खर्च

७) प्रयोगशाळेसंबंधातील खर्च

८) रोगनिदान करण्याचा खर्च

मात्र खाजगी सुश्रुषा, परिचारिका, डॉक्टरची निवास तपासणी फी (व्हिजिट फी) आणि सर्वसाधारण सेवा खर्च यावर जरी कर्मचा-याने रक्कम खर्च केली असली व त्या रकमेचा बिलात समावेश असला तरी त्या रकमेची प्रतिपूर्ती कर्मचा-यास मिळणार नाही.

२. मंडळाने, स.आ.क्र. २० (कर्मचारीवर्ग) व त्या आदेशाच्या सुधारपत्रात निर्दिष्ट केलेले गंभीर आजार व शस्त्रक्रिया करावे लागणारे आजार यावर कर्मचा-याने स्वतःसाठी खाजगी रुग्णालयात केलेल्या वैद्यकीय खर्चापैकी २५ टक्के रकमेची प्रतिपूर्ती कर्मचा-यास देण्याचा निर्णय, सदस्य (प्रशासन)/सचिव व लेखा सदस्य यांच्याशी विचार-विनिमय करून घेण्याचा अधिकार अध्यक्षांना प्रदान केला आहे.

. . २/-

३. मंडळाने, कर्मचा-यांना लागू असलेल्या स.आ. क्र. २० (वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ति योजना) अन्वये अधिसूचित केलेल्या शस्त्रक्रिया अंतर्भूत असलेल्या रोगसूचीमध्ये खालील शस्त्रक्रियांचा समावेश करण्याचे ठरविले आहे :

१) हृदोधि-उच्छेदन शस्त्रक्रिया (थायरेक्टॉमी ऑपरेशन)

२) मूतखडा शस्त्रक्रिया (युरेटरी स्टोन ऑपरेशन)

३) मल्टिपल-बिग युटेरिन ॲंड सर्व्हिकल फिब्रॉइड्स ॲंड ॲम्बिलीकल हर्निया शस्त्रक्रिया

४) एक्टॉपिक गर्भधारणा शस्त्रक्रिया (एक्टॉपिक प्रेग्नन्सी ऑपरेशन)

४. मागील प्रकरणे विचारात घ्यावयाची नाही असेही मंडळाने ठरविले आहे.

सही/-
सदस्य(प्रशासन)/सचिव

---------

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ

दिनांक : ३० जानेवारी, १९८१

सुधारपत्र क्र. ४५
(स.आ.क्र. २० (कर्मचारीवर्ग), दि. १७ जून १९६३ करिता)

मंडळाने आपला ठराव क्र. ८८७, दिनांक १५ जानेवारी १९८१ अन्वये, वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ती व वैद्यकीय भत्ता पुढीलप्रमाणे वाढीव दराने दिनांक १ जानेवारी १९८१ पासून देण्यास मान्यता दिली आहे :

१) वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ती :

(प्रकरणपरत्वे विद्यमान रु. २०४/- किंवा रु. २४० या दरांऐवजी) प्रतिवर्षी रु. ४८०/- या दराने, स.आ.क्र. ८३, दिनांक ६ जुलै १९७७ लागू होणाऱ्या, परंतु जेथे मंडळाचे स्वत:चे दवाखाने आहेत अशा विद्युत केंद्रांच्या ठिकाणी काम करणारे व राज्य कामगार विमा अधिनियम/योजना लागू असणारे कर्मचारी वगळता, सर्व कर्मचाऱ्यांना.

२) मासिक वैद्यकीय भत्ता :

(प्रकरणपरत्वे विद्यमान रु. १७/- किंवा रु. २०/- या दरांऐवजी) दरमहा रु. ४०/- या दराने, स.आ.क्र. ८०, दिनांक १९ जानेवारी १९७७ लागू होणाऱ्या, परंतु जेथे मंडळाचे स्वत:चे दवाखाने आहेत अशा विद्युत केंद्रांच्या ठिकाणी काम करणारे व राज्य कामगार विमा अधिनियम योजना लागू असणारे कर्मचारी वगळता, सर्व कर्मचाऱ्यांना.

३) नाममात्र हजेरीपटावरील कर्मचाऱ्यांना वैद्यकीय भत्ता :

नियुक्तीच्या तारखेपासून सलग एक वर्ष सेवा पूर्ण झालेल्या नाममात्र हजेरीपटावरील कर्मचाऱ्यांना, त्यांनी प्रत्यक्ष काम केलेल्या दिवसांसाठी (पगारी रजा, साप्ताहिक रजा व पगारी सार्वजनिक सुट्ट्या यांसह) प्रतिदिन रु. १/- या दराने वैद्यकीय भत्ता देण्यात येईल.

२. स.आ.क्र. २० (कर्मचारीवर्ग), दिनांक १७ जून १९६३ मधील, वैद्यकीय खर्च प्रतिपूर्तीबाबतच्या इतर अटी व शर्ती अबाधित राहतील.

सही/-
सचिव (प्रशासन)/सचिव

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ

दिनांक : २० जानेवारी, १९८२

सुधारपत्र क्र. ४६

(स.आ.क्र. २० (कर्मचारीवर्ग), दि. १७ जून १९६३ करिता

मंडळाने आपला ठराव क्र. १०९१, दिनांक २२ जून १९८१ अन्वये असा निर्णय घेतला आहे की, मंडळाचे स्वतःचे दवाखाने असलेल्या विद्युत केंद्रांखेरीज इतर ठिकाणच्या व राज्य कामगार विमा अधिनियम/योजना लागू असणा-या ठिकाणां-व्यतिरिक्त इतर ठिकाणच्या कर्मचा-यांना, त्यांची वेतनश्रेणी कोणतीही असली तरी, खाली नमूद केलेल्या शर्तींवर प्रतिवर्षी रु. ४८०/- या मर्यादेपर्यंत वैद्यकीय खर्चापोटी प्रतिपूर्ती देण्याचा किंवा दरमहा रु. ४०/- या दराने वैद्यकीय भत्ता देण्याचा विकल्प देण्याची मुभा देण्यात यावी. त्या शर्ती खालीलप्रमाणे :

कर्मचा-याला, प्रकरणपरत्वे वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ती योजनेऐवजी मासिक नियत वैद्यकीय भत्ता योजनेप्रमाणे किंवा त्याउलट लाभ मिळण्याचा विकल्प त्याच्या नियंत्रक अधिका-याकडे सादर करावा लागेल. असा विकल्प दोन आर्थिक वर्षांसाठी लागू राहील. असा विकल्प कर्मचा-याने मार्च महिन्यात, म्हणजे त्याला लागू असलेल्या योजनेप्रमाणे पुढील आर्थिक वर्षासाठी कोणताही लाभ देण्यापूर्वी, दिला पाहिजे.

२. उपर्युक्त निर्णय दिनांक १ एप्रिल १९८२ पासून लागू होईल.

सही/-
सचिव

--------

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ

दिनांक : २ जानेवारी, १९८६

सुधारपत्र क्र• ४९

(स•आ•क्र• २० (कर्मचारीवर्ग), दि• १७ जून १९६३ करिता)

मंडळाने आपला ठराव क्र• १७९३, दिनांक ११ डिसेंबर १९८५ अन्वये खालील-प्रमाणे मान्यता दिली आहे :

(१) वैद्यकीय भत्ता दरमहा रु• ४०/- ऐवजी दरमहा रु• ८०/- करणे;

(२) वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीची वार्षिक मर्यादा रु• ४८०/- ऐवजी रु• १०००/- करणे;

(३) वरील दोन्ही रकमांच्या प्रदानाच्या प्रयोजनास्तव "वर्ष" हे "आर्थिक वर्ष" न मानता "कॅलेंडर वर्ष" मानणे; उदाहरणार्थ, दिनांक १ जानेवारी १९८६ ते दिनांक ३१ डिसेंबर १९८६•

(४) दिनांक ३१ डिसेंबर १९८५ रोजी शिल्लक असलेली वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीची रक्कम पुढे हिशेबात घेणे•

२• वैद्यकीय भत्ता व वैद्यकीय खर्च प्रतिपूर्तीची वार्षिक मर्यादा यात वरीलप्रमाणे केलेली वाढ दिनांक १ जानेवारी १९८६ पासून लागू होईल•

३• मंडळाने आदेश दिला आहे की, वैद्यकीय खर्च प्रतिपूर्तीच्या रकमेपैकी मागणी न केल्यामुळे शिल्लक राहिलेली रक्कम तो कर्मचारी सेवानिवृत्त होईपर्यंत हिशेबात घेतली जावी• मागणी न केल्यामुळे शिल्लक राहणारी रक्कम त्याच्या सेवानिवृत्तीच्या वेळी व्यपगत होईल•

४• या सुधारपत्रामुळे, स•आ•क्र• २० (कर्मचारीवर्ग), दिनांक १७ जून १९६३ मधील परिच्छेद ४ (एक) व परिच्छेद २ (दोन) (इ) यातील "वर्ष" या संज्ञेच्या अर्थात वर दर्शविल्याप्रमाणे सुधारणा करण्यात आल्याचे मानण्यात येईल• स•आ•क्र•२० (कर्मचारीवर्ग), दिनांक १७ जून १९६३ मध्ये अंतर्भूत असलेल्या, वैद्यकीय भत्ता व वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ती या दोहोंसाठीच्या इतर शर्ती व तरतुदी अबाधित राहतील•

सही/-
सदस्य(प्रशासन)/सचिव

--------

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ

दिनांक : २९ एप्रिल, १९८६

सुधारपत्र क्र. ५०

(स.आ.क्र. २० (कर्मचारीवर्ग), दि. १७ जून १९६३ करिता)

मंडळाने आपला ठराव क्र. १३९, दिनांक २३ एप्रिल १९८६ अन्वये पुढील-प्रमाणे मान्यता दिली आहे :

वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ती योजना किंवा वैद्यकीय भत्ता योजना याबाबत कर्मचा-यांना आपला विकल्प सादर करण्यासाठी पुन्हा नव्याने संधी दिली जावी.

(क) कर्मचा-यांनी आपला विकल्प दिनांक ३० जून १९८६ पर्यंत सादर केला पाहिजे;

(ख) तो दिनांक १ जुलै १९८६ पासून लागू होईल;

(ग) विद्यमान कर्मचा-यांनी दिलेला व भावी कर्मचा-यांकडून एकदा दिला जाणारा विकल्प अंतिम असेल व विद्युत केंद्रांच्या ठिकाणी त्यांची पदस्थापना झाल्यास तेवढा काळ वगळता, त्यांच्या सेवेच्या संपूर्ण कालावधीसाठी तो त्यांच्यावर बंधनकारक असेल.

(घ) विद्यमान कर्मचा-यांकडून वरीलप्रमाणे विकल्प प्राप्त न झाल्यास, त्यांना लागू असलेली विद्यमान योजना त्यांच्या सेवानिवृत्तीपर्यंत लागू राहावी अशी त्यांची इच्छा आहे असे समजले जाईल.

(च) दिनांक १ जुलै १९८६ पासून वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ति योजनेऐवजी वैद्यकीय भत्ता योजना लागू व्हावी अशी कर्मचा-याची इच्छा असल्यास आणि दिनांक १ जानेवारी ते ३० जून १९८६ या काळासाठी अनुज्ञेय असणा-या वैद्यकीय भत्त्यापेक्षा जास्त रक्कम वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ति योजनेखाली त्याला दिली गेली असल्यास, ती जादा रक्कम तो मंडळास परत करील या अटीवरच, त्याचा विकल्प स्वीकारला जाईल.

२. हे सुधारपत्र प्रसृत केल्यामुळे, सुधारपत्र क्र. ४६, दिनांक १० जानेवारी १९८२ मधील विकल्प देण्यासंबंधातील तरतुदींमध्ये वरीलप्रमाणे सुधारणा झाली आहे.

सही/-
सचिव

--------

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ

दिनांक : २८ ऑक्टोबर, १९८६

सुधारपत्र क्र. ५१

(स.आ.क्र. २० (कर्मचारीवर्ग), दि. १७ जून १९६३ करिता)

मंडळाने, आपला ठराव क्र. ३०५, दिनांक १२ सप्टेंबर १९८६ अन्वये पुढील बाबींना मंजुरी दिली आहे :

(क) "परिहृद उपमार्ग" (कॉरोनरी बायपास) विषयक शस्त्रक्रिया झालेल्या आणि "हृदस्नायु रक्तरोधन ऊतिअंत" (मायोकार्डिअल इन्फार्क्शन) [(हृदयविकाराचा झटका) (हार्ट अॅटॅक)] हा वैद्यकीय रोग झालेल्या कर्मचा-याला, त्याला सर्वसाधारण रजा नियमांनुसार अनुज्ञेय असलेली त्याची सरासरी वेतनावरील व अर्ध सरासरी वेतनावरील रजा संपल्यानंतर, विशेष कारणांच्या आधारे (अनुक्रमे १८० दिवस व ९० दिवस एवढया मर्यादेपर्यंत) अर्ध सरासरी वेतनावरील रजा मंजूर करण्यास मान्यता देणे.

एक) वरील दोन्ही बाबतींत विशेष कारणाच्या आधारे रजा मंजूर करताना, प्रत्येक प्रकरणी, शस्त्रक्रियेचे स्वरूप किती गंभीर आहे यावर किंवा त्या संबंधातील परिस्थितीवर अवलंबून असेल तसेच ती रजा रुग्णालयातील उपचार करणा-या डॉक्टरने दिलेल्या वैद्यकीय प्रमाणपत्राच्या आधारे मंजूर करण्यात येईल;

दोन) उक्त रजेची सवलत ही संबंधित कर्मचा-याला त्याच्या संपूर्ण सेवा कालावधीत केवळ एकदा अनुज्ञेय असेल आणि विशेष कारणाच्या आधारे मंजूर करण्यात आलेली अशी अर्ध सरासरी वेतनावरील रजा पूर्ण वेतनावरील परिवर्तित करण्यास परवानगी देण्यात येणार नाही.

(ख) वरील (क) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे विशेष कारणांच्या आधारे द्यावयाची रजा, वैद्यकीय सल्लागार, सदस्य (प्रशासन) व लेखा सदस्य यांच्याशी विचारविनिमय करून मंजूर करण्यास अध्यक्षांना अधिकार प्रदान करणे.

२. मंडळाने आणखी असाही निर्णय घेतला आहे की वरील निर्णय, मंडळाने घेतला त्या दिनांकापासून, म्हणजेच, दिनांक १२ सप्टेंबर १९८६ पासून अंमलात येईल.

सही/-
सदस्य (प्रशासन)

--------

क्र. साप्रवि/आस्था./८ र.व का./फा.६०३/
महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ,

दिनांक : २१ ऑगस्ट, १९८७

सुधारपत्र क्र. ५३

(सर्वसाधारण आदेश क्र. २० (कर्मचारीवर्ग), दि.१७ जून १९६३ करिता)

विषय : प्रकल्प बांधकामाच्या ठिकाणी काम करणाऱ्या व अन्य प्रकल्प कर्मचारीवर्गाने, विद्युत केंद्राशी संलग्न असलेल्या दवाखान्यातून वैद्यकीय सुविधांचा लाभ घेण्याविषयी किंवा त्याऐवजी रोख रक्कम घेण्याविषयी विकल्प देणे.

मंडळाने आपला ठराव क्र. ६५२, दि. २९ जून १९८७ व ठराव क्र. ६५४, दिनांक १८ जुलै १९८७ अनुसार, सर्वसाधारण आदेश क्र. २० (कर्मचारीवर्ग), दि. १७ जून १९६३ अन्वये अधिसूचित केलेल्या वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ति योजनेच्या विनियम क्र. ४ यातील खंड सहा नंतर खंड सात म्हणून पुढील मजकूर समाविष्ट करण्यास मंजुरी दिली आहे.

"सात) क) विभिन्न औष्णिक/जलविद्युत केंद्रांतील निर्मीत बांधकामाच्या देखरेखीसाठी मंजूर केलेल्या प्रशासनिक कार्यालयात काम करीत असलेल्या कर्मचाऱ्यांसहित प्रकल्प बांधकामांच्या ठिकाणी कार्यरत असलेल्या सर्व कर्मचाऱ्यांना, विद्युत केंद्रांना संलग्न असणाऱ्या मंडळाच्या दवाखान्यांतून वैद्यकीय सेवेचा लाभ घेणे किंवा तसा तो घ्यावयाचा नसल्यास दरमहा वैद्यकीय भत्ता किंवा वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती घेणे यापैकी एक विकल्प देण्याबाबत परवानगी देण्यात यावी. सदर कर्मचाऱ्यांना असा विकल्प, हे आदेश जारी करण्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत, सोबतच्या विहित नमुन्यात द्यावा लागेल.

ख) कर्मचाऱ्यांनी एकदा दिलेला विकल्प अंतिम असेल आणि एकदा दिलेल्या विकल्पात त्यांना कोणताही बदल करता येणार नाही.

ग) विद्यमान कर्मचाऱ्यांकडून ठरवून दिलेल्या मुदतीत वरीलप्रमाणे विकल्प प्राप्त न झाल्यास, त्यांना विद्यमान योजनाच चालू ठेवण्याची इच्छा आहे असे समजण्यात येईल.

घ) वरील योजना दिनांक १ सप्टेंबर १९८७ पासून लागू होईल.

च) दि. १ सप्टेंबर १९८७ पासून किंवा त्यानंतर ज्या कर्मचाऱ्यांना दरमहा रु. ८०/- प्रमाणे वैद्यकीय भत्ता द्यावयाचा असेल किंवा वार्षिक रु.१०००/- प्रमाणे वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती द्यावयाची असेल त्यांना अशी रक्कम वैद्यकीय भत्ता किंवा वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ति योजना लागू होण्याच्या तारखेपासून प्रमाणशीर दराने मिळेल. (विकल्प नमुन्यातील टीप २ पहावी)".

सही/-
(र. क. भार्गव)
सदस्य(प्रशासन)/सचिव

सोबत : विकल्पाचा नमुना.

प्रत रवाना : प्रेषण यादीप्रमाणे सर्वांना.

सर्वसाधारण आदेश क्र. २० (कर्मचारीवर्ग), दि. १७ जून १९६३
याचे सुधारपत्र क्र. ५३, दि. २१ ऑगस्ट १९८७ चे संहपत्र.

---

मी ------------------------------------------, ---------------,
(पदनाम)

---------------------------------------------------- येथे काम करीत असून
(कार्यालयाचे नाव व ठिकाण)

वैद्यकीय योजनेच्या, खाली नमूद केलेल्या बाबींपैकी बाब क्र. ------------ या पर्याय दिनांक ---------- पासून मी स्वीकारीत आहे (महिना आणि वर्ष विनिर्दिष्ट करावे).

१) x विद्युत केंद्राला संलग्न असलेल्या मंडळाच्या दवाखान्यातून वैद्यकीय सुविधांचा लाभ घेणे.

२) x दरमहा रु. ८०/- प्रमाणे वैद्यकीय भत्ता घेणे.

३) x वार्षिक रु. १०००/- प्रमाणे वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती घेणे.

ठिकाण :

कर्मचाऱ्याची सही

दिनांक :

नियंत्रण अधिकाऱ्याची सही

x लागू नसेल तो मजकूर खोडावा.

---

टीपा :

१) हा विकल्प तीन प्रतींमध्ये देण्यात यावा. त्याची पहिली प्रत कर्मचाऱ्याच्या वैयक्तिक फाईलमध्ये ठेवावी; दुसरी प्रत वेतन बिल शाखेला पाठवावी आणि तिसरी प्रत मंडळाच्या दवाखान्याच्या प्रभारी वैद्यकीय अधिकाऱ्याला पाठवावी.

२) कर्मचाऱ्याने दिलेला विकल्प, त्याने तो दिला असेल त्या महिन्याच्या लगतनंतर येणाऱ्या महिन्यापासून लागू होईल.

३) वैद्यकीय भत्ता किंवा वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी ज्या कर्मचाऱ्यांनी विकल्प दिला असेल त्यांच्यावर मंडळाच्या दवाखान्यात मोफत वैद्यकीय उपचार केले जाऊ नयेत यासाठी कर्मचाऱ्याने दिलेल्या विकल्पाची एक प्रत मंडळाच्या दवाखान्याच्या प्रभारी वैद्यकीय अधिकाऱ्याला पाठविण्याची जबाबदारी नियंत्रण अधिकाऱ्याची राहील.

क्र• साप्रवि/८ र•वका•/फा•६०३/३८०३४
महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ,
हॉंगकॉंग बँक इमारत, तिसरा मजला,
महात्मा गांधी मार्ग, फोर्ट,
मुंबई - ४००_००१•

दिनांक : १ डिसेंबर १९८७

## प_रि_प_त्र_क

विषय : प्रकल्प बांधकामाच्या ठिकाणी काम करणा-या व अन्य प्रकल्प कर्मचारीवर्गाने वीजनिर्मित केंद्राशी संलग्न असलेल दवाखान्यातून वैद्यकीय सुविधांचा लाभ किंवा त्याप्रीत्यर्थ रोख रक्कम देण्याविषयी विकल्प देणे•

मंडळाच्या ठराव क्र• ६५२, दि• २९ जून १९८७ अन्वये मंडळाने दिलेल्या मंजुरी-
नुसार सर्वसाधारण आदेश क्र• २० (कर्मचारीवर्ग), दि• १७ जून १९६३ ला काढलेल्या
सुधारपत्र क्र• ५३, दि• २१ ऑगस्ट १९८७ खाली, विभिन्न औष्णिक/जलविद्युत केंद्रातील
निर्मित बांधकामाच्या देखरेखीसाठी मंजूर केलेल्या प्रशासनिक कार्यालयात काम करीत
असलेल्या कर्मचा-यांसहित प्रकल्प बांधकामाच्या ठिकाणी कार्यरत असलेल्या कर्मचा-यांना
वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ति योजनेचा/दरमहा वैद्यकीय भत्ता सुविधेचा लाभ दिला आहे•

तथापि, भांडार अधिकारी, प्रमुख भांडार, "ब", परळी-वैजनाथ, यांनी भांडा
कार्यालयात काम करणा-या कर्मचारीवर्गाचा, सुधारपत्र क्र• ५३, दि• २१ ऑगस्ट १९८७
मध्ये समावेश आहे का आणि दि• १ सप्टेंबर १९८७ पासून तेही विकल्प देऊ शकतात का
असा मुद्दा उपस्थित केला होता•

वरील मुद्दा विचारात घेऊन असा निर्णय घेण्यात आला आहे की सुधारपत्र क्र•
५३, दि• २१ ऑगस्ट १९८७ मध्ये करारनिर्दिष्ट केलेल्या विकल्प देण्याबाबतच्या
सुविधेचा लाभ, विभिन्न औष्णिक/जलविद्युत केंद्रांतील निर्मित बांधकामाच्या देखरेखी-
साठी मंजूर केलेल्या प्रशासनिक कार्यालयात काम करीत असलेल्या कर्मचा-यांसहित प्रकल्प
बांधकामाच्या ठिकाणी, व त्यांना संलग्न असलेल्या भांडार कर्मचा-यांनाही देण्यात
येईल• असा विकल्प भांडार कर्मचा-यांना, सुधारपत्र क्र• ५३, दि• २१ ऑगस्ट १९८७
सोबतच्या विहित नमुन्यात, हे परिपत्रक प्रसृत झाल्यापासून ३० दिवसांच्या आत देता
येईल•

ज्या कर्मचा-यांना, विकल्प देण्याच्या तारखेपासून किंवा त्या तारखेनंतर दर-
महा रु• ८०/- प्रमाणे वैद्यकीय भत्त्याच्या रोख रकमेचा किंवा दरवर्षी रु• १०००/-
प्रमाणे वैद्यकीय खर्चाचा प्रतिपूर्तीचा लाभ घ्यावयाचा असेल त्यांना त्या विकल्पाचा लाभ
सुधारपत्र क्र• ५३ सोबत जोडलेल्या नमुन्यातील टीप दोन प्रमाणे लागू असलेल्या तारखे-
पासून प्रमाण दरानुसार मिळेल•

सही/-
( र• क• भार्गव )
सदस्य(प्रशासन)/सचिव